दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शुक्रवार, दि. २३ जानेवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १२१ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सुविचार

संस्कार ही व्यक्तीच्या जीवनाची खरी ओळख असते. लहानपणापासून चांगले संस्कार मिळाले, तर आयुष्यात निर्णय, वर्तन आणि संबंध नेहमी प्रगल्भ आणि योग्य राहतात.

## पश्चिम रेल्वेवर एसी लोकल

**मुंबई** : मुंबईची लाइफलाइन असलेल्या लोकल प्रवासात आता थंडावा आणखी वाढणार आहे. पश्चिम रेल्वेने प्रवाशांच्या वाढत्या मागणीचा विचार करून २६ जानेवारी म्हणजेच प्रजासत्ताक दिनी १२ नवीन एसी लोकल फेऱ्या सुरू करण्याचा निर्णय घेतलाय. वाढता उकाडा आणि गर्दीमुळे मुंबईकर एसी लोकलला पसंती देत आहेत. हीच बाब लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने विरार, बोरिवली, भाईंदर आणि गोरेगाव या मार्गांवर नवीन सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतलाय.

## सारांश वृत्त

### निवडणूक आयोगाचा डिजिटल प्लॅटफॉर्म

**नवी दिल्ली :** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी मतदार, अधिकारी आणि राजकीय पक्षांसाठी एक नवीन डिजिटल इंटरफेस लॉंच केला. या प्लॅटफॉर्मला त्यांनी चुकीच्या माहितीला तोंड देण्यासाठी उपयुक्त साधन म्हणून सादर केले. या इंटरफेसद्वारे मतदारांना योग्य माहिती मिळेल आणि राजकीय पक्ष, तसेच अधिकारी यांना माहितीचे सत्यापन करता येईल. त्यांनी या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या आंतरराष्ट्रीय निवडणूक व्यवस्थापन संस्थांना देखील त्यांच्या भाषांमध्ये आणि स्थानिक कायद्यांनुसार समान प्रकारचे साधन विकसित करण्यास मदत करण्याची ऑफर दिली.

### बेंगळुरू जगातील दुसरे गर्दीचे शहर

**बेंगळुरू :** नेदरलँड्सस्थित लोकेशन टेक्नॉलॉजी फर्म टॉमटॉमने जारी केलेल्या आकडेवारीनुसार, भारतातील आयटी हब, बेंगळुरू, २०२५ मध्ये जागतिक स्तरावर दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक गर्दीचे शहर ठरले आहे, येथे सरासरी गर्दीची पातळी ७४.४ टक्के आहे. टॉमटॉमच्या २०२५ च्या वाहतूक निर्देशांकात मेक्सिको सिटीला अव्वल स्थान देण्यात आले आहे, त्यानंतर बेंगळुरू आणि डब्लिनचा क्रमांक लागतो, असे अहवालात म्हटले आहे. हा निर्देशांक जगभरातील शहरांचे सरासरी प्रवास वेळ आणि गर्दीच्या पातळीच्या आधारे मूल्यांकन करतो.

### शेअर ट्रेडिंगमध्ये ७४.६ लाखांची फसवणूक

**ठाणे :** नवी मुंबईतील एका ५९ वर्षीय व्यक्तीला उच्च परताव्याच्या आमिषाने शेअर ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक करण्याचे आमिष दाखवून ७४.६७ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. आरोपीने पीडित व्यक्तीशी संपर्क साधला आणि त्याला शेअर ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले. त्याचा विश्वास संपादन करण्यासाठी त्याच्या खात्यात नफा जमा केला.

## २९ महापालिकांचे आरक्षण जाहीर

# पुणे - मुंबईची सूत्रे महिलांच्या हातात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** २९ महानगरपालिकांच्या महापौरपदासाठी गुरुवारी आरक्षण जाहीर करण्यात आले. नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत आरक्षणाची सोडत काढण्यात आली. या वेळी भाजपकडून महामंत्री राजेश शिरवडकर, ठाकरे गटाकडून मुंबई महापालिकेच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर व आमदार मनोज जामसुतकर, तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडून आनंद परांजपे उपस्थित होते.

यंदा ५० टक्के महिला आरक्षणाचा नियम लागू झाल्याने राज्यातील २९ पैकी १५ महानगरपालिकांमध्ये महिलांना महापौरपदाची संधी मिळणार आहे. विशेष म्हणजे पुणे आणि बृहन्मुंबई या प्रमुख शहरांमध्येही महापौरपद महिलांसाठी राखीव ठेवण्यात आले आहे. त्यामुळे राज्याच्या राजकीय आणि प्रशासकीय दृष्ट्या महत्त्वाच्या महापालिकांमध्ये महिलांचे नेतृत्व ठळकपणे दिसून येणार आहे.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील महापौरपद आधी सर्वसाधारण महिला वर्गासाठी ठेवले गेले होते. अंतिम आरक्षण यादीत ते खुले ठेवण्यात आले आहे. त्यामुळे येथे नेमकी कोणाची वर्णी लागणार याबाबत उत्सुकता कायम आहे.

महिलांसाठी राखीव असलेल्या १५ महापालिकांपैकी ९ ठिकाणी सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसाठी, ४ ठिकाणी ओबीसी महिलांसाठी, तर २ ठिकाणी अनुसूचित जातीतील महिलांसाठी आरक्षण लागू करण्यात आले आहे. उर्वरित १४ महापालिकांमध्ये महापौरपद सर्वसाधारण खुल्या प्रवर्गासाठी ठेवण्यात आले आहे.

राज्यातील २९ महापौरपदांच्या आरक्षणाचा विचार करता अनुसूचित जमातीसाठी १, अनुसूचित जातीसाठी ३, नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) साठी ८ आणि सर्वसाधारण प्रवर्गासाठी १७ महापौरपदे राखीव ठेवण्यात आली आहेत. मुंबई, पुणे, नवी मुंबई, नागपूर, नाशिक, मालेगाव, धुळे, नांदेड-वाघाळा यांसारख्या शहरांमध्ये सर्वसाधारण महिला आरक्षण लागू झाले आहे. अकोला, चंद्रपूर, जळगाव आणि अहिल्यानगर येथे ओबीसी महिलांना संधी मिळणार असून लातूर आणि जालना येथे अनुसूचित जातीतील महिलांसाठी महापौरपद राखीव आहे. पिंपरी-चिंचवड, सोलापूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर आणि परभणी येथे महापौरपद सर्वसाधारण खुल्या प्रवर्गासाठी आहे.

२९ महानगरपालिकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान झाले होते, तर १६ जानेवारीला मतमोजणी पार पडली. मतदानाच्या टक्केवारीकडे पाहिले तर मुंबईत ५२.९४ टक्के, ठाण्यात ५६ टक्के, पुण्यात ५२ टक्के, पिंपरी-चिंचवडमध्ये ५८ टक्के, नवी मुंबई आणि नाशिकमध्ये प्रत्येकी ५७ टक्के मतदान झाले. परभणीत ६६ टक्के तर जालन्यात ६१ टक्के मतदानाची नोंद झाली.

मुंबई वगळता राज्यातील इतर सर्व महापालिकांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग रचना लागू आहे. बहुतांश प्रभाग चार सदस्यीय असून काही प्रभाग तीन किंवा पाच सदस्यीय आहेत. महापौरपदाचे आरक्षण जाहीर झाल्याने आता प्रत्येक महापालिकेत सत्ता स्थापनेसाठी राजकीय हालचालींना वेग येणार असून, विशेषतः पुणे आणि मुंबईत महिला महापौर कोण होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## दहशतवादी हल्ल्याचा मोठा कट उधळला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** प्रजासत्ताक दिनापूर्वी दिल्लीसह अनेक शहरांमध्ये दहशत निर्माण करण्याचा कट उघडकीस आला आहे.

पाकिस्तानी गुप्तचर संस्था, आयएसआय, "२६-२६" या सांकेतिक नावाने दहशतवादी हल्ला करण्यासाठी जैश-ए-मोहम्मदसोबत काम करत आहे. या गुप्तचर माहितीनंतर, देशभरातील अनेक संवेदनशील भागात सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे.

या कटाचा पर्दाफाश झाल्यानंतर गुप्तचर संस्थांनी दिल्ली पोलिस, जम्मू आणि काश्मीर पोलिस आणि इतर सुरक्षा एजन्सींना सतर्क केले. या धमकीला प्रतिसाद म्हणून, दिल्ली पोलिसांनी पहिल्यांदाच एक विशेष वॉन्टेड नोटीस जारी केली, ज्यामध्ये अल-कायदाचा संशयित दहशतवादी आणि दिल्लीचा रहिवासी मोहम्मद रेहानचा फोटो समाविष्ट होता.

यात शाहिद फैसलचे नावही आहे, ज्याला दक्षिण भारतातील अनेक स्फोटांचा मास्टरमाइंड म्हणून वर्णन केले आहे. यात बेंगळुरूमधील रामेश्वरम कॅफे स्फोटाचा समावेश आहे. गुप्तचर अहवालांनी इशारा दिला आहे की दहशतवादी गट प्रजासत्ताक दिनापूर्वी देशाच्या वेगवेगळ्या भागात एकाच वेळी हल्ले करण्याची योजना आखत आहेत.

"२६-२६" हा कोड प्रजासत्ताक दिनापूर्वी आखण्यात आलेल्या मोठ्या दहशतवादी कटाचा संदर्भ देतो. दहशतवादी वातावरण बिघडवण्यासाठी देशभरातील प्रमुख मंदिरांना लक्ष्य करत आहेत. यामध्ये अयोध्येतील राम मंदिर आणि जम्मूतील रघुनाथ मंदिर यांचा समावेश आहे.

## राहुल गांधी यांचा केंद्र सरकारवर हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर कठोर टीका करत म्हटले की, सरकार मजूरांच्या प्रश्नांबाबत त्याच पद्धतीने वागत आहे जसे २०१८ ते २०२१ दरम्यान शेतकऱ्यांच्या विरोधात कृषी कायदे रद्द करताना केले होते. त्यांनी आरोप केला की महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार गारंटी कायदा (मनरेगा) रद्द करण्याचा निर्णय गरीब आणि मजूर वर्गाच्या हक्कांवरचा गंभीर आघात आहे आणि याला विरोध करण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे आवश्यक आहे.

दिल्लीमध्ये मनरेगा कार्यकर्त्यांच्या बैठकीत बोलताना राहुल गांधी म्हणाले की, हा कायदा गरीब आणि मजूर वर्गाला हक्क आधारित रोजगार देण्याचा महत्त्वाचा आधार होता. मात्र आता केंद्र सरकार जी रामजी सारख्या नव्या कायद्याद्वारे रोजगाराच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे. त्यांच्या मते, केंद्र सरकार रोजगाराचे काम आणि निधीचे वाटप ठरवून, भाजप शासित राज्यांना अधिक लाभ देण्याचा प्रयत्न करत आहे.

राहुल गांधी म्हणाले की, २०१८ मध्ये आणलेले तीन कृषी कायदे मोठ्या शेतकऱ्यांच्या विरोधामुळे मागे घेतले गेले आणि आता त्याच प्रकारचा प्रयत्न मजूरांसोबत केला जात आहे. पूर्वी मजूरांना थेट मिळणारे फायदे आता कंत्राटदार आणि प्रशासकीय स्तरावरून विलीन होत आहेत, असा आरोप त्यांनी केला. मजूर, गरीब आणि स्थानिक कामगारांना एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी केले.

## जवळचा मित्र आणि उत्तम व्यक्ती असल्याचे म्हणत प्रशंसा

# पंतप्रधान मोदींवर ट्रम्प यांची स्तुतीसुमने

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**दावोस (स्वित्झर्लंड) :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दावोस येथे जागतिक आर्थिक मंचाच्या बैठकीत बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे. 'जवळचा मित्र' आणि 'उत्तम व्यक्ती' अशा शब्दात त्यांनी मोदींची प्रशंसा केली. उभय देशांमध्ये लवकरच व्यापार करार होईल असा विश्वास देखील ट्रम्प यांनी यावेळी व्यक्त केला.

ट्रम्प यांनी भारतीय माध्यमांशी साधलेल्या संवादात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी असलेले संबंध आणि दोन्ही देशांमधील व्यापार करारावर भाष्य केले. "तुमच्या पंतप्रधानांप्रती मला खूप आदर आहे. ते उत्तम व्यक्ती असून माझे जवळचे मित्र आहेत. लवकरच आम्ही मोठा करार करु, असे डोनाल्ड ट्रम्प म्हणाले. मोदींच्या मृदू आणि त्याचवेळी कठोर स्वभावाचा उल्लेख ट्रम्प यांनी केला. गेल्यावर्षी ऑक्टोबरमध्ये देखील मोदींच्या स्वभावाच्या दोन्ही पैलूंचा उल्लेख ट्रम्प यांनी केला होता. वैश्विक स्तरावर व्यापारापलीकडे मोदींच्या नेतृत्वाचे कौतुक ट्रम्प यांनी केले होते. जागतिक पातळीवर भारताचा आदर केला जाऊ लागला आहे. आंतरराष्ट्रीय नेते मोदींचे ऐकू लागले आहेत, असेही ट्रम्प म्हणाले.

भारत-अमेरिका व्यापार करारावर असलेले काही मतभेद दूर करण्यासाठी वॉशिंग्टन आणि नवी दिल्ली यांच्यात सध्या वाटाघाटी सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांची ही टिप्पणी महत्त्वाची मानली जात आहे. दोन्ही देशांमधील व्यापारी संबंधांमध्ये गेल्या काही काळात तणाव दिसून आला होता, मात्र दावोस मधील ट्रम्प यांचा सूर सौहार्दपूर्ण आणि सकारात्मक होता. संभाव्य व्यापार कराराबाबत थेट प्रश्न विचारला असता, हा करार दोन्ही देशांसाठी फायदेशीर ठरेल, असा विश्वास ट्रम्प यांनी व्यक्त केला. या घडामोडीमुळे भारत-अमेरिका आर्थिक सहकार्याला नवी दिशा मिळण्याची शक्यता आहे.

दरम्यान, भारताची वाढती आर्थिक व राजनैतिक ताकद, युरोपशी जवळीक आणि जागतिक पातळीवर भारताचे महत्त्व लक्षात घेऊन ट्रम्प यांनी मोदी यांचे कौतुक केले. अमेरिकेचे हितसंबंधही सुरक्षित राहतात, असे मानले जात आहे.

## दोडात लष्कराचे वाहन दरीत कोसळले

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरच्या दोडा जिल्ह्यात गुरुवारी लष्कराचे चिलखती वाहन रस्त्यावरून घसरून २०० फूट खोल दरीत कोसळल्याने १० जवानांचा मृत्यू झाला तर ७ जण जखमी झाले.

एकूण १७ जवानांना घेऊन जाणारे लष्कराचे वाहन एका उंच चौकीकडे जात असताना चालकाचे नियंत्रण सुटले आणि ते वाहन भादरवाह-चंबा रस्त्यावरील खन्नी टॉप येथे २०० फूट खोल दरीत कोसळले. अपघातानंतर लगेचच, जखमी सैनिकांना बाहेर काढण्यासाठी लष्कर, पोलिस आणि स्थानिक रहिवाशांनी बचाव कार्य सुरू केले.

यापूर्वी, अधिकृत सूत्रांनी सांगितले की, घटनास्थळावरून चार सैनिकांचे मृतदेह सापडले आहेत, तर इतर १३ जणांना जखमी अवस्थेत वाचवण्यात आले आहे आणि त्यांना जवळच्या लष्करी रुग्णालयात हलवण्यात आले आहे. गंभीर जखमी झालेल्या काही सैनिकांना विशेष उपचारांसाठी उधमपूर लष्करी रुग्णालयात विमानाने हलवण्यात आले. तथापि, आणखी सात जवानांचा मृत्यू झाल्याने मृतांची संख्या १० झाली आहे. परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी वरिष्ठ नागरी आणि लष्करी अधिकाऱ्यांनी अपघातस्थळी धाव घेतली. संपूर्ण केंद्रशासित प्रदेशात प्रजासत्ताक दिनाचे कार्यक्रम शांततेत आणि सुरळीत पार पाडण्यासाठी सुरक्षा संस्था आणि प्रशासनाने कडक सुरक्षा उपाययोजना केल्या असताना ही दुर्घटना घडली.

यापूर्वीही जम्मू-काश्मीरमध्ये अशा प्रकारच्या अपघातांच्या घटना घडल्या आहेत. ४ मे २०२५ रोजी रामबन जिल्ह्यातील बॅटरी चश्मा परिसरात लष्कराचे वाहन सुमारे ६०० मीटर खोल दरीत कोसळले होते. या अपघातात तीन जवानांचा मृत्यू झाला होता. संबंधित वाहन जम्मू ते श्रीनगर जाणाऱ्या ताफ्याचा भाग होते. चालकाचा ताबा सुटल्याने हा अपघात झाला होता.

तसेच, २४ डिसेंबर रोजी पुंछ जिल्ह्यातही लष्कराची व्हॅन सुमारे ३५० फूट खोल दरीत पडली होती. या वाहनात १८ जवान होते, त्यापैकी पाच जणांचा मृत्यू झाला. हे सर्व जवान ११ मराठा रेजिमेंटचे होते. अशा वारंवार घडणाऱ्या दुर्घटनांमुळे डोंगराळ भागातील रस्त्यांची सुरक्षितता आणि वाहतूक व्यवस्थेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

## वाहतूक कोंडीत पुणे जगात पाचवे

**पुणे :** पुण्यात वाहतुकीचा वेग वाढल्याचे निरीक्षण वाहतूक पोलिसांनी काही दिवसांपूर्वीच नोंदविले असताना, जगातील कोंडीमुक्त शहरांच्या यादीतही पुण्याने अंशतः सुधारणा केली आहे. वाहतूक कोंडीत गेल्या वर्षी जगात चौथ्या क्रमांकावर असलेल्या पुण्याला २०२५मध्ये पाचव्या क्रमांकाचे स्थान मिळाले आहे. जगात सर्वाधिक वाहतूक कोंडीत बेंगळुरू दुसऱ्या क्रमांकावर असून, मुंबई १८व्या स्थानावर आहे. जगभरातील प्रत्येक मोठ्या शहरात वाहनांची संख्या वाढल्याने कमी अंतर कापण्यासाठी ४९२ शहरांमधील वाहतुकीची माहिती गोळा करून त्याचे विश्लेषण करून सविस्तर अहवाल तयार केला गेला.

## श्रीमंत गणेश जयंती निमित्त

# दैनिक राज्य लोकतंत्र कार्यालयात होमहवन

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** आज (गुरुवारी) माघमास शुक्लपक्ष गणेश चतुर्थी निमित्त पिंपरी मोरवाडी येथील दैनिक राज्य लोकतंत्र कार्यालयामध्ये गणेश याग व तीर्थप्रसाद आयोजित करण्यात आला होता. दिवसभर होमहवन विधी संपन्न झाला व तीर्थप्रसाद वाटप करण्यात आला.

दैनिक राज्य लोकतंत्र कार्यालयास पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी उपस्थित राहून तीर्थप्रसाद घेतला व दैनिक राज्य लोकतंत्रचे प्रतिनिधी संजीव ओक यांनी श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी उपस्थित दैनिक राज्य लोकतंत्रचे मुख्य संपादक गणेश मोकाशी, डिजिटल मिडिया पिंपरी चिंचवडचे अध्यक्ष विनय सोनवणे, लोकशाहीचा चौथा स्तंभ या वृत्तपत्राचे संपादक सागर सूर्यवंशी, एच आर न्युज मराठीचे संपादक हणुमंत रामदासी, दैनिक राज्य लोकतंत्रचे प्रतिनिधी सिद्धांत चौधरी यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावली.

पिंपरी-चिंचवड पत्रकार संघाचे सर्व सदस्यही कार्यक्रमाला आवर्जुन उपस्थित होते.

## पूजापाठ व नमाजाचे वेळापत्रक ठरले

# भोजशाला वादावर सर्वोच्च न्यायालयाचा तोडगा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**भोजशाळा :** मध्य प्रदेशातील धार येथील ऐतिहासिक भोजशालेत वसंत पंचमी आणि जुम्म्याची नमाज एकाच दिवशी येत असल्याने निर्माण झालेला वाद आता शांत झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने गुरुवार, दि. २२ जानेवारी रोजी महत्त्वाचा निर्णय देत स्पष्ट केले की उद्या तेथे पूजा आणि नमाज दोन्ही गोष्टी होतील. न्यायालयाच्या आदेशानुसार, दुपारी १ वाजेपर्यंत हिंदू पक्षाला पूजा करण्याची परवानगी देण्यात आली आहे. त्यानंतर दुपारी १ ते ३ या वेळेत मुस्लिम पक्षाला नमाज अदा करण्यासाठी वेळ देण्यात येईल. दुपारी ३ वाजल्यानंतर हिंदू पक्ष पुन्हा आपली पूजा सुरू करू शकणार आहे. दोन्ही पक्षांसाठी स्वतंत्र जागा आणि विशेष पासची व्यवस्था करण्याचे निर्देश न्यायालयाने प्रशासनाला दिले आहेत.

हिंदू पक्षातर्फे वकील विष्णु शंकर जैन यांनी वसंत पंचमीच्या दिवशी पूजा सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत चालते या कारणास्तव संपूर्ण वेळ केवळ पूजेसाठीच परवानगी द्यावी आणि नमाज रोखावी, अशी मागणी केली होती. मुस्लिम पक्षातर्फे सलमान खुर्शीद यांनी बाजू मांडली. दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने सांगितले की दोन्ही समुदायांना प्रार्थना करण्याची मुभा दिली जाईल, मात्र प्रशासनाने सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्थेची योग्य काळजी घ्यावी. मध्य प्रदेश सरकारनेही न्यायालयाला कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ दिला जाणार नाही, असे आश्वासन दिले आहे.

हिंदू पक्ष भोजशालेला देवी सरस्वतीचे (वाग्देवी) मंदिर मानतो, तर मुस्लिम पक्ष याला कमाल मौला मशिद मानतो. २००३ पासूनची व्यवस्था अशी होती की मंगळवारी हिंदू पूजा करायचे आणि शुक्रवारी नमाज होत असे. मात्र यंदा २३ जानेवारी रोजी बसंत पंचमी आणि शुक्रवार एकाच दिवशी आल्याने वाद चिघळला. सध्या पुरातत्व विभागाच्या सर्वेक्षणाचा अहवालही न्यायालयात प्रलंबित आहे. कोणताही तणाव निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने रस्त्यांवर टायर, मलबा किंवा बांधकाम साहित्य ठेवण्यावरही बंदी घातली आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. न्यायालयाच्या आदेशांचे पालन करत दोन्ही पक्षांचे धार्मिक कार्यक्रम शांततेत पार पडावेत, यासाठी स्थानिक नागरिक व भाविकांना शांतता राखण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या संवेदनशील प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर धार जिल्ह्यात कडेकोट सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. संपूर्ण शहरात ८,००० हून अधिक पोलीस व सुरक्षा दल तैनात करण्यात आले आहेत. नाक्यानाक्यावर सीसीटीव्ही द्वारे नजर ठेवली जात आहे. प्रशासनाने भोजशालेच्या ३०० मीटर परिसराला 'नो-फ्लायिंग झोन' घोषित केले असून, तेथे ड्रोन किंवा कोणतीही उडणारी वस्तू नेण्यास सक्त मनाई आहे.

## आंध्रात १६ वर्षांखालील मुलांना सोशल मीडियावर बंदी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**हैदराबाद :** सोशल मीडियाचा सर्वाधिक प्रभाव हा किशोरवयीन मुलांवर पडतो. या माध्यमाचा नकारात्मक प्रभाव टाळण्यासाठी ऑस्ट्रेलियाने १६ वर्षांखालील मुलांना सोशल मीडिया बंदी लागू केली आहे. आता देशातील आंध्रप्रदेशातही अशा प्रकारच्या निर्णयाबाबत गांभीर्याने विचार सुरू असून, लवकरच त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे.

याबाबत आंध्र प्रदेशचे मंत्री नारा लोकेश यांनी खुलासा केला की, सरकार १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालण्याचा विचार करत आहे. ही बंदी ऑस्ट्रेलियाने लागू केलेल्या बंदीसारखीच असेल.

दावोस येथील जागतिक आर्थिक मंचच्या निमित्ताने ब्लूमबर्गशी बोलताना, आंध्रच्या माहिती तंत्रज्ञान मंत्र्यांनी सांगितले की, एका विशिष्ट वयापेक्षा कमी वयाच्या तरुणांनी अशा प्लॅटफॉर्मवर नसावे. कारण ही मुले अशा माहितीच्या संपर्कात येतात ज्या त्यांना पूर्णपणे समजत नाही. त्यामुळेच एका मजबूत कायदेशीर चौकटीची आवश्यकतेबाबत विचार आवश्यक आहे. सरकार याचा गांभीर्याने विचार करत आहे. तो लागू झाला, तर आंध्र प्रदेश मुलांसाठी सोशल मीडिया वापरावरील निर्बंध आणणारे भारतातील पहिले राज्य ठरणार आहे.

# डिजिटल चलन: भारतासाठी संधी!

जागतिक आर्थिक संतुलन बदलत असताना, ब्रिक्स देशांच्या डिजिटल चलनांच्या समन्वयातून भारतासाठी नव्या धोरणात्मक संधी निर्माण होत आहेत. ई-रुपी आणि आंतरराष्ट्रीय सीबीडीसी नेटवर्कमुळे व्यवहार अधिक सुरक्षित, वेगवान आणि स्वायत्त होतील, तर डॉलरवर अवलंबित्व कमी होण्याची शक्यता उभी राहणार आहे.

राजकीय व्यवहार आणि आर्थिक धोरणे यामधील सेतु बांधण्याची गरज आता केवळ भारतीय संदर्भापुरती मर्यादित नाही, तर जागतिक स्तरावरही महत्वाची ठरत आहे. डिजिटल चलन, विशेषतः केंद्रीय बँकांकडून जारी केलेले डिजिटल रूपे, हे केवळ व्यवहार सुलभ करण्याचे साधन नाहीत, तर त्यांचे व्यापक धोरणात्मक, भू-राजकीय आणि आर्थिक परिणाम आहेत. भारताने ई-रुपीच्या माध्यमातून याचा पायाभूत पाया तयार केला आहे आणि आता ब्रिक्स सदस्य देशांच्या डिजिटल चलनांशी त्याची सुसंगत जोडणी करण्याचे विचार सुरू आहेत. यामुळे सीमा पार व्यवहार अधिक वेगवान, विश्वासार्ह आणि कमी खर्चिक होऊ शकतात, तसेच डॉलरवर अवलंबित्व कमी होण्याची संधी निर्माण होते. सीबीडीसी म्हणजे काय आणि त्याचे महत्व काय आहे, हे स्पष्ट असणे आवश्यक आहे. ही मध्यबँकेद्वारे जारी केलेली डिजिटल चलनाची अधिकृत रूपे आहेत, जी कागदी नोटा किंवा बँक खात्यातील इलेक्ट्रॉनिक रक्कमपेक्षा वेगवान आणि तंत्रज्ञानाने सुसज्ज आहेत. भारतात ई-रुपीने पायलट वापरकर्त्यांमध्ये उत्सुकता निर्माण केली आहे आणि विविध फिनटेक वॉलेट्स, प्रोग्रामेबल सबसिडी, तसेच ऑफलाइन व्यवहारांसाठी सुविधा उपलब्ध करून या नव्या तंत्रज्ञानाची व्यावहारिकता सिद्ध केली आहे. आता या तंत्रज्ञानाचा खरी क्षमता आंतरराष्ट्रीय पातळीवर पाहायला मिळणार आहे, जिथे ब्रिक्स सदस्य देश त्यांची सीबीडीसी प्रणाली एकत्रित करण्याचे विचार करत आहेत. अर्थव्यवस्थेतील पारंपारिक डॉलर-आधारित प्रणालीवर अवलंबित्व कमी करण्याची गरज या प्रस्तावाच्या मागे प्रमुख कारण आहे. जागतिक व्यापारात डॉलर हे प्रमुख चलन म्हणून वापरले जाते, ज्यामुळे काही देशांना आर्थिक दबाव, चलनशास्त्रीय आव्हाने आणि राजकीय दबावांना सामोरे

**» दावोससारख्या जागतिक व्यासपीठावर सत्तेच्या बदलत्या स्वरूपावर प्रश्न उपस्थित होणे, ही बाबच आजच्या लोकशाहीसमोरील आव्हान अधोरेखित करते. व्यक्तीप्रधान नेतृत्व, संस्थांची मर्यादित भूमिका आणि निर्णयप्रक्रियेचे केंद्रीकरण यामुळे लोकशाहीचा आत्मा संकुचित होत असल्याचे दिसते.**



जावे लागते. जर ब्रिक्स देशांचे डिजिटल चलन एकत्र जोडले गेले, तर व्यवहार अधिक वेगवान, सुरक्षित आणि स्वायत्त होऊ शकतात. यामुळे अमेरिकेच्या आर्थिक प्रभावाचा तुलनात्मक कमी होण्याची शक्यता निर्माण होईल आणि आर्थिक निर्णायकता अधिक समानपातळीवर येईल. तांत्रिक दृष्टीकोनातून पाहता, या उपक्रमाची अंमलबजावणी ही एक आव्हानात्मक कामगिरी आहे. विविध देशांच्या डिजिटल चलनांना एकमेकांशी जोडण्यासाठी सक्षम प्रणालीची आवश्यकता आहे. तसेच, प्रत्येक देशाचे आर्थिक धोरण, चलन स्थिरता, सुरक्षा उपाय, आणि व्यवहारांची पारदर्शकता या सर्व गोष्टींचे संतुलन साधणे आवश्यक आहे. काही देशांनी आपली आर्थिक धोरणे कठोर पद्धतीने राबवायची आहेत, तर काहींना त्यांच्या डिजिटल चलनाच्या सार्वत्रिक स्वीकार्यता सुनिश्चित करावी लागेल. या सर्व बाबींचा समन्वय साधणे म्हणजे एक तंत्रज्ञान, धोरण आणि राजकीय कौशल्याची जटिल प्रक्रिया आहे. भू-राजकीय परिणामांकडे पाहता, हा प्रस्ताव फक्त आर्थिक नव्हे तर राजकीय बदलांचीही चिन्हे दर्शवतो. अमेरिकेच्या चलन व व्यापार धोरणांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता असून, त्यामुळे आंतरराष्ट्रीय आर्थिक परिस्थितीत नवीन संतुलन साधले जाऊ शकते. ब्रिक्स देशांच्या सीबीडीसी प्रणालीने केवळ व्यवहाराचा वेग वाढवला नाही, तर जागतिक आर्थिक तळावर सत्ता वितरणाच्या नव्या दृष्टिकोनाला मार्गही दिला आहे. हा उपक्रम हे एक आर्थिक आणि राजकीय 'सेतु' आहे, जे जागतिक आर्थिक घडामोडींमध्ये नवीन धुंद भर घालू शकते. अर्थात, या उपक्रमाचे यश केवळ तंत्रज्ञानाच्या सक्षमतेवर अवलंबून नाही, तर ब्रिक्स सदस्य देशांची एकमतता, धोरणात्मक सहकार्य आणि जागतिक आर्थिक नियमांच्या स्वीकारार्हतेवरही अवलंबून आहे. जर ही प्रक्रिया प्रभावी झाली, तर जागतिक आर्थिक व्यवहार अधिक प्रतिसादक्षम, सुरक्षित आणि पारदर्शक होऊ शकतात. भारतासाठी हे एक सुवर्णसंधी आहे, जिथे देशांतर्गत फायदे तसेच जागतिक आर्थिक दर्जामध्ये सुधारणा साधता येईल. आजचा काळ हे केवळ चलनाच्या नव्या रूपांचीच चर्चा नाही; तो आर्थिक धोरणे, राजकीय संतुलन, बहुपक्षीय सहकार्य आणि पारदर्शकतेच्या संदर्भातील काळ आहे. भारतासारख्या देशासाठी सीबीडीसी चा योग्य उपयोग म्हणजे केवळ व्यवहार सुलभ करणे नाही, तर आर्थिक निर्णय प्रक्रियेत स्वायत्तता, पारदर्शकता आणि जागतिक स्तरावर धोरणात्मक वजन मिळवण्याचा मार्ग आहे. ब्रिक्स संदर्भातील सीबीडीसी समन्वय हे आर्थिक सेतु बांधण्याचे माध्यम आहे, जे जागतिक आर्थिक परिस्थितीत स्थिरता आणि प्रतिसादक्षमता सुनिश्चित करू शकते. संक्षेप करता, डिजिटल चलन आणि आंतरराष्ट्रीय समन्वय हा फक्त तांत्रिक नव्हे, तर धोरणात्मक आणि राजकीय निर्णयांसाठीही महत्त्वाचा टप्पा आहे. भारताने या प्रक्रियेत सक्रिय भूमिका घेतली, तर आर्थिक, भौगोलिक आणि राजकीय पैलूंमध्ये संतुलन साधता येईल. या उपक्रमातून जागतिक स्तरावर विश्वासार्ह, जलद आणि सुरक्षित व्यवहार व्यवस्था उभारता येईल, जी केवळ आजच्या नव्या आर्थिक परिस्थितीसाठी उपयुक्त नाही, तर भविष्यातील धोरणात्मक बदलांसाठीही पाया घालणारी ठरेल.

## संपादकीय

# राज्यपाल आणि राज्य सरकार; संवैधानिक संतुलनाचा प्रश्न

**भारतीय लोकशाहीत राज्यपालांचा पद निवडून आलेल्या सरकारशी समन्वय साधण्याचा आहे. मात्र अलीकडील घटनांनी प्रश्न उपस्थित केला आहे; भाषण वाचण्यात विलंब, परिच्छेद वगळणे आणि स्वतः निर्णय घेणे हे राज्यपालांच्या भूमिकेतील संतुलन मोडत असल्याचे दाखवते.**



भारतीय राज्यघटनेत राज्यपालांचा पद केवळ औपचारिक किंवा प्रतीकात्मक नसून, निवडून आलेल्या राज्य सरकार आणि प्रशासन यांच्यातील संवैधानिक सेतू मानले गेले आहे. परंतु अलीकडील काही घटनांनी या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. राज्यपालांनी विधानसभेत मंत्रिमंडळाने तयार केलेले भाषण वाचण्याचे कर्तव्य पार पाडले नाही, काही परिच्छेद वगळले किंवा फक्त काही ओळी वाचून सभागृह सोडले, अशा घटनांनी संवैधानिक परंपरेला धक्का बसवला आहे. ही केवळ औपचारिकता नाही, तर राज्यातील जनादेशाची, शासनाची पारदर्शकता आणि निर्णय प्रक्रियेची सार्वजनिक पुष्टी आहे. भारतीय लोकशाहीत राज्यपाल मोठे की राज्य सरकार हा प्रश्न सतत चर्चेचा विषय राहतो. संविधान स्पष्ट करतो की राज्यपाल हे राज्याचे प्रतिनिधी असले तरी त्यांचे काम निवडून आलेल्या मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार वागणे आहे. तरीही अनेकदा राज्यपाल स्वतः निर्णय घेतल्यास किंवा सरकारचे भाषण वाचण्यास नकार दिल्यास तणाव निर्माण होतो. वास्तवात राज्याचे निर्णय घेण्याची जबाबदारी आणि कार्यकारी सत्ता निवडून आलेल्या सरकारकडेच आहे; राज्यपाल फक्त संवैधानिक मार्गदर्शक आणि निरीक्षक म्हणून काम करतो. मोठेपणा त्यांच्या व्यक्तिशः कृतीत नाही, तर संविधानाच्या मर्यादेत राहून पारदर्शकता राखण्यात आहे. संविधान स्पष्टपणे सांगते की राज्यपालांना सरकारच्या सल्ल्याने वागावे लागते आणि मंत्रिमंडळाच्या भाषणाचे वाचन करणे त्यांचे घटनात्मक कर्तव्य आहे. मात्र अनेक राज्यपाल आज या भूमिका केवळ औपचारिकतेपुरत्या मर्यादित ठेवतात किंवा केंद्र सरकारच्या धोरणांचे प्रतिनिधित्व करतात, ज्यामुळे निर्वाचित सरकाराच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. भाषण वाचण्यात विलंब करणे, परिच्छेद वगळणे किंवा भाषण रद्द करणे या सर्व कृती राज्यशक्ती आणि केंद्रशक्ती यांच्यातील समन्वयावर ताण आणतात आणि निर्णय प्रक्रियेत गोंधळ निर्माण करतात. राज्यपालांच्या भूमिकेचा उद्देश फक्त सत्ता वापरण्याचा नसून, राज्यातील निर्णयांवर तटस्थ देखरेख ठेवणे आणि राज्य शासनाचे धोरण लोकांसमोर आणणे हा आहे. जेव्हा राज्यपाल स्वतः तयार केलेले भाषण वाचतात किंवा मंत्रिमंडळाने तयार केलेले भाषण वगळतात, तेव्हा निवडलेल्या सरकारच्या धोरणावर प्रश्नचिन्ह निर्माण होते. त्यामुळे लोकशाहीत पारदर्शकतेवर परिणाम होतो आणि नागरिकांचा विश्वास कमी होतो. राज्यपालांनी त्यांच्या भूमिकेचे नीट आकलन करणे गरजेचे आहे. संविधानाने दिलेल्या अधिकारांचा योग्य वापर करणे, मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार निर्णय घेणे आणि औपचारिकतेपेक्षा महत्त्वाच्या लोकशाही मूल्यांचा आदर करणे हे त्यांचे कर्तव्य आहे. निवडून आलेल्या सरकारच्या अभिभाषणाचे वाचन हा फक्त औपचारिक कार्यक्रम नाही; तो लोकशाही प्रक्रियेत पारदर्शकता आणि जबाबदारी सुनिश्चित करणारा महत्त्वाचा टप्पा आहे. राज्यपालांची भूमिका फक्त औपचारिकतेपुरती मर्यादित राहिली, तर भारतीय संघराज्यीय तत्त्वांचे रक्षण होणे कठीण होईल. त्यामुळे राज्यपालांनी संवैधानिक जबाबदाऱ्या नीट समजून घेतल्या पाहिजेत आणि त्यांच्या कृतीत राज्यातील लोकशाही प्रक्रियेला बाधा पोहोचू देऊ नये. भारतीय लोकशाही फक्त निवडणुकीपर्यंत मर्यादित नसून, शासनाच्या प्रत्येक टप्प्यावर पारदर्शक आणि जबाबदार असावी, याची खात्री करणे हे राज्यपालांचे कर्तव्य आहे. भारतीय राज्यघटनेत राज्यपालांचा पद फक्त औपचारिक नाही; ते राज्यातील लोकशाही आणि संविधानीय तंत्राची सुरक्षा करणारे संवैधानिक सेतू आहे. तरीही अलीकडील घटनांनी या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. राज्यपालांनी मंत्रिमंडळाचे भाषण वाचण्याचे कर्तव्य पार पाडले नाही, काही परिच्छेद वगळले किंवा फक्त काही ओळी वाचून सभागृह सोडले. ही क्रिया निवडून आलेल्या सरकारच्या धोरणावर तंटा निर्माण करते आणि लोकशाहीत पारदर्शकतेला धक्का पोहोचवते. राज्यपालांचे काम सत्ता वापरण्याचे नसून, तटस्थ मार्गदर्शन आणि निर्णय प्रक्रियेत संतुलन राखणे हे आहे. त्यांच्या कृतीत मोठेपणा त्यांच्या व्यक्तिशः निर्णयात नाही, तर संविधानाचे पालन करून पारदर्शकता सुनिश्चित करण्यात आहे. भाषण वाचण्यात विलंब, परिच्छेद वगळणे किंवा स्वतःचे भाषण वाचन हे फक्त औपचारिकतेपेक्षा अधिक व्यापक परिणाम निर्माण करतात. राज्यपालांनी संवैधानिक जबाबदाऱ्या नीट समजून घेतल्या पाहिजेत, जेणेकरून निवडलेल्या सरकाराची कार्यक्षमता बाधित होऊ नये आणि लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा विश्वास टिकून राहील.

# पुणे महापौरपदासाठी भाजपची आखणी; अनुभवधारी का नवे चेहरा – निर्णयाची

## भाजपला महापालिकेत निर्विवाद बहुमत; देवेंद्र फडणवीस यांच्या भूमिकेकडे लक्ष

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे महापालिका निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाने १६५ पैकी ११९ जागांवर निर्विवाद बहुमत मिळवल्याने आता महापौरपदासाठी उमेदवार निवडीचा विषय चर्चेत आला आहे. पक्षाकडून दुसऱ्या कार्यकाळात महापौरपदासाठी अनुभवी नेत्याला संधी मिळेल की धक्कातंत्राचा वापर करून 'नवा चेहरा' पुढे येईल, याची उत्कंठा सक्रिय आहे.



भाजपमध्ये वरिष्ठ पदाधिकाऱ्यांचे मत आहे की महापौरपदासाठी अनुभवी आणि महापालिकेच्या कार्यपद्धतीची जाण असलेल्या नेत्याला संधी दिली पाहिजे, कारण शहराच्या मोठ्या योजनांचा प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी सक्षम नेतृत्व आवश्यक आहे. यासाठी अनेक नावं चर्चेत आहेत. या चर्चेत माजी सभागृह नेते गणेश बीडकर, श्रीनाथ भिमाले, राजेंद्र शिळीमकर यांसह महिला नगरसेविका वर्षा तापकीर, मानसी देशपांडे, मंजूषा नागपुरे या काही नावांचा समावेश आहे. तथापि, पक्षाचे वरिष्ठ नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पुण्यावरील विशेष लक्ष असल्यामुळे निर्णय स्थानिक पातळीवर होऊ की त्यांच्या मार्गदर्शनाखाली, यावरही चर्चा सुरू आहे. महापौरपदासाठी आरक्षणाचे स्वरूप जाहीर होण्याची प्रक्रियाही जवळपास आहे, त्यामुळे कोणत्या प्रवर्गासाठी हे आरक्षण लागणार यावरही गृहीत गणिते तयार केली जात आहेत. आरक्षणाचे स्वरूप ठरताच अंतिम उमेदवारांची यादी आखण्यात येईल, अशी उत्सुकता पक्षाच्या वर्तुळात आहे. भाजपकडून निवडणूक जाहीर झाल्यापासून चर्चा असलेली ही नावे अंतिम यादीत टिकतील की राहणार नाहीत, हे पुढील काही दिवसांत स्पष्ट होणार आहे.

# श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीच्या दर्शनासाठी पहाटेपासून भाविकांची गर्दी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** माघ शुद्ध चतुर्थीनिमित्त पुण्याचे आराध्य दैवत श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात पहाटेपासूनच भाविकांची मोठी गर्दी जमली आहे. पहाटे तीन वाजल्यापासूनच पुणेकरांनी आपल्या लाडक्या गणरायाच्या दर्शनासाठी मंदिर परिसरात हजेरी लावली होती. भक्तिभाव, श्रद्धा आणि उत्साहाचे दर्शन या वेळी पाहायला मिळाले.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्या वतीने माघी गणेशोत्सवानिमित्त विशेष धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. आज दुपारी बारा वाजता सुवर्णपाळण्यात भव्य गणेश जन्मसोहळा साजरा होणार असून, या सोहळ्यासाठी भाविकांमध्ये विशेष उत्सुकता आहे. या प्रसंगी वैदिक मंत्रोच्चार, आरती आणि भजनाच्या माध्यमातून संपूर्ण परिसर भक्तिरसमय झाला आहे.

मंदिर परिसर आकर्षक पुष्पसजावट आणि झगमगत्या विद्युत रोषणाईने सजवण्यात आला असून, दर्शनासाठी सुरळीत व्यवस्था करण्यात आली आहे. गर्दीचे नियोजन आणि भाविकांच्या सुरक्षिततेसाठी स्वयंसेवक आणि पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. माघ शुद्ध चतुर्थीनिमित्त गणरायाच्या दर्शनासाठी भाविकांचा उत्साह ओसंडून वाहताना दिसत आहे.

# हवामानाचा लहरीपणा कायम; दिवसा कडक ऊन, रात्री गारठा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** शहरासह उपनगरांमध्ये सध्या हवामानाचा लहरीपणा जाणवत असून पुणेकरांना विचित्र वातावरणाचा सामना करावा लागत आहे. गेल्या दोन–तीन दिवसांत दिवसा तीव्र उन्हाचे चटके तर रात्री हुडहुडी भरणारा गारवा असा परस्परविरोधी अनुभव येत आहे. हवेली तालुक्यात तापमानाचा पारा मोठ्या प्रमाणात घसरला असून 10.9 अंश सेल्सिअस इतके नीचांकी तापमान नोंदवले गेले आहे.

गेल्या आठवड्यात थंडी काहीशी ओसरली होती. किमान तापमान 14 ते 16 अंशांच्या दरम्यान पोहोचल्याने गारवा कमी झाला होता. मात्र मागील 48 तासांत हवामानात अचानक बदल झाला असून काही भागांत तापमान 9 अंशांपर्यंत खाली आले. त्यामुळे हवेली, एनडीए आणि पाषाण परिसरात पुन्हा थंडीचा कडाका जाणवू लागला. दुसरीकडे, दिवसाच्या कमाल तापमानात वाढ झाल्याने दुपारी उष्णता वाढली आहे. पहाटे हलकं धुकं व गारवा, तर दुपारी कडक ऊन असे चित्र आहे. एनडीए, वारजे, नांदेड फाटा, पाषाण व कात्रज भागांत रात्री थंडी अधिक जाणवते, तर मध्यवर्ती शहरात उकाडा आहे. पुढील २४ तासांत हलक्या पावसाचा अंदाज असून, राज्यात थंडीचा जोर वाढण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

# चारचाकी ईव्हीला आता 'आवाज' प्रदुषण नाही, सुरक्षा वाढणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** इलेक्ट्रिक वाहनांची (ईव्ही) वाढती संख्या वाहनाच्या आवाजाशिवाय चालण्याने पादचारी आणि इतर वाहनचालकांसाठी सुरक्षा धोका निर्माण होत आहे. या समस्येवर उपाय म्हणून ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया (एआरएआय) यांनी इलेक्ट्रिक वाहनांसाठी एक नवीन Acoustic Vehicle Alerting System (AVAS) विकसित केले आहे, अशी माहिती एआरएआयचे संचालक रेजी मथाई यांनी पुण्यात नुकतीच आयोजित 'सिम्पोझियम ऑन इंटरनॅशनल ऑटोमोटिव्ह टेक्नॉलॉजी (एसआयएटी २०२६)' परिषदेत दिली आहे.



ईव्ही वाहनांमध्ये 'आवाज' नसल्यामुळे जवळ येत असलेले वाहन पादचाऱ्यांना किंवा सायकलस्वारांना लक्षात येत नाही, ज्यातून अपघातांची शक्यता वाढते. या पार्श्वभूमीवर एआरएआयने संशोधनातून AVAS प्रणाली विकसित केली असून, तिचे चाचणी निकाल पूर्ण झाले आहेत आणि **चारचाकी ईव्हींमध्ये तिची अंमलबजावणी पुढील ऑक्टोबर २०२६ पासून केली जाणार आहे. दुचाकी आणि तीनचाकी ईव्हींमध्ये या प्रणालीच्या चाचण्या सद्याच्या वेळेत सुरू आहेत, असे मथाई यांनी स्पष्ट केले. या प्रणालीमध्ये वाहनाच्या कमी गतीवर (नवीन नियमांनुसार सुमारे 0–20 किमी/तास) वाहन जवळ येत असल्यास किंवा चालू असताना त्यातून कृत्रिम पण लक्षवेधी आवाज निर्माण होईल, ज्यामुळे पादचारी आणि इतर वाहनचालकांना वाहन येत असल्याची अलर्ट मिळणार आहे. हे वैशिष्ट्य विशेषतः शहरातील गर्दीच्या भागात रस्त्यावर फिरणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षा दृष्टीने उपयुक्त ठरेल. एसआयएटी २०२६ परिषदेत या प्रणालीबरोबरच वाहन सुरक्षितता व तंत्रज्ञानाच्या नव्या ट्रेंडवर अनेक विषयांवर चर्चा होणार आहे, ज्यात उद्योग व्यावसायिक, संशोधक, स्टार्टअप्स व विद्यार्थी सहभागी होतील. या परिषदेचा उद्देश भारतीय वाहन उद्योगात नवीन तंत्रज्ञान व सुरक्षा उपाय समोर आणणे आणि जागतिक दर्जाशी सुसंगत ठेवणे आहे. AVAS सारख्या उपायांमुळे इलेक्ट्रिक वाहनांची सुरक्षा पातळी उंचावली जाते आणि अपघातांची संख्या कमी करण्यास मदत होते. भविष्यात हे वैशिष्ट्य अन्य देशांप्रमाणे भारतात सर्व इलेक्ट्रिक वाहनांसाठी अनिवार्य केल्यास सार्वजनिक रस्त्यावर सुरक्षितता बळकट होण्यास मदत होईल असा संभाव्य मार्गही अभ्यासला जात आहे.

# भाजप सक्रीय कार्यकर्ते सचिन काळभोर यांना संधी मिळणार की घरचा रस्ता?

## पिंपरी–चिंचवडमध्ये भाजपच्या स्वीकृत नगरसेवक पदांसाठी हालचालींना वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** भारतीय जनता पार्टीला पिंपरी–चिंचवड महानगरपालिकेत एकहाती सत्ता मिळाल्यानंतर स्वीकृत नगरसेवक पदांसाठी जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. आमदार, खासदार, मंत्री तसेच प्रदेश पातळीवरील नेत्यांकडे शिफारशीसाठी इच्छुकांची गर्दी वाढली असून, पक्षांतर्गत राजकारण तापले आहे. अशा परिस्थितीत भाजपचे सक्रीय व निष्ठावंत कार्यकर्ते सचिन काळभोर यांना आमदार महेश लांडगे संधी देणार की दुर्लक्ष करणार, याबाबत शहरात चर्चा रंगू लागली आहे.



सचिन काळभोर यांनी गेल्या अनेक वर्षांपासून पक्षासाठी तळागाळात काम केले असून, आंदोलने, मोर्चे, जनआंदोलन तसेच पक्षाची भूमिका नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात ते नेहमीच अग्रभागी राहिले आहेत. स्वीकृत नगरसेवक पदासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले असून, येत्या पंधरा दिवसांत पिंपरी–चिंचवड महापालिकेत नवीन स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती होण्याची शक्यता आहे. शहर अध्यक्ष व गटनेत्यांच्या शिफारशीवर ही नियुक्ती होणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टपणे आमदार, खासदारांचे नातेवाईक किंवा राजकीय दबावाखालील उमेदवारांना स्वीकृत नगरसेवक पदांवर संधी देऊ नये, अशा सूचना दिल्या आहेत. तरीही काही ठिकाणी शिफारशींचा दबाव वाढत असल्याने जुने आणि नवे कार्यकर्ते यांच्यात अस्वस्थता निर्माण झाली आहे.

२०१७ मध्ये भाजपची एकहाती सत्ता असताना स्वीकृत नगरसेवक म्हणून संधी मिळालेल्यांपैकी काहींनी नंतर पक्ष सोडल्याचा अनुभव लक्षात घेता, यावेळी अधिक काटेकोर निवड व्हावी, अशी मागणी होत आहे. स्थानिक भूमिपुत्र, निष्ठावंत आणि स्वच्छ प्रतिमेच्या कार्यकर्त्यांना संधी द्यावी, अशी अपेक्षा भाजप कार्यकर्ते आणि शहरवासीयांकडून व्यक्त होत आहे. शहर अध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, अमित गोरखे, उमा खापरे, अमर साबळे, सदाशिव खाडे यांच्यासमोर योग्य उमेदवारांची निवड करणे मोठे आव्हान ठरणार आहे. भ्रष्टाचाराच्या आरोपांपासून पक्षाची प्रतिमा वाचवण्यासाठी आणि कार्यकर्त्यांमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी निष्ठावंत व स्थानिक कार्यकर्त्यांनाच संधी द्यावी, अशी ठाम भावना शहरात व्यक्त होत आहे. अंतिम यादीकडे आता संपूर्ण पिंपरी–चिंचवडचे लक्ष लागले आहे.





# पुणे ग्रँड चॅलेंज टूर-२०२६ : स्पर्धा मार्गावरील शाळा २३ जानेवारी रोजी दुपारी १२ नंतर बंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पुणे ग्रँड चॅलेंज टूर-२०२६ या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेच्या चौथ्या टप्प्यानिमित्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील स्पर्धा मार्गावरील सर्व सरकारी व खासगी शाळा २३ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत सुरू ठेवून त्यानंतर बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष जितेंद्र डूडी यांनी जारी केले आहेत.

ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा छत्रपती शिवाजी स्टेडियम, बालेवाडी येथून सुरू होणार असून राजीव गांधी ब्रिजमार्गे पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत प्रवेश करणार आहे. सांगवी, वाकड, निगडी, त्रिवणीनगर, भोसरी, चिखली, पिंपरी, काळेवाडी आदी परिसरातून मार्गक्रमण करून स्पर्धा पुन्हा राजीव गांधी ब्रिजमार्गे पुणे शहरात प्रवेश करणार आहे.

स्पर्धा सुरक्षित व सुरळीत पार पडावी तसेच नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी स्पर्धा मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेशबंदी करण्यात आली असून वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी सांगवी, वाकड, रावेत, ताथवडे, पुनावळे, निगडी प्राधिकरण, इंद्रायणीनगर, चिंचवड एमआयडीसी, चिखली, काळेवाडी, भोसरी एमआयडीसी, यशवंतनगर व त्रिवेणीनगर परिसरातील सर्व शाळा दुपारी १२ नंतर बंद राहणार आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### विषारी धुराचा कहर; नागरिकांमध्ये संताप

**फुरसुंगी-उरुळी :** देवाची परिसरातील काही गोदामांमध्ये रबर, केबल वायर, प्लास्टिक आणि ई-वेस्ट बेकायदा जाळल्याने परिसरात विषारी धूर पसरला असून नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे. श्वसनास त्रास, डोकेदुखी, मळमळ, उलटी व डोळ्यांची जळजळ अशी तक्रारी वाढल्या आहेत. नियमांचे उल्लंघन करत व्यावसायिकांनी औद्योगिक झोन व परवानगीशिवाय हा कचरा जाळला, तर नागरिकांनी दोषींवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी केली आहे. अग्निसुरक्षा आणि कामगार सुरक्षेचे नियम पाळले जात नसल्याचेही आढळले आहे, त्यामुळे परिसरात प्रदूषणाचे प्रमाण धोकादायक पातळीवर पोहोचले आहे.

### श्री गणेशचरणी पाच हजार पुस्तकांचा महानैवेद्य

**पुणे :** श्री गणेश जयंतीनिमित्त जय गणेश व्यासपीठाच्या पुढाकारातून श्री गणेशचरणी पाच हजार पुस्तकांचा महानैवेद्य अर्पण करण्यात आला. शनिवार पेठेतील नवीन मराठी शाळेत हा उपक्रम राबविण्यात आला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना महाप्रसादाच्या रूपाने ही पुस्तके वाटप केली जाणार आहेत. वाचनसंस्कृती वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमात पुस्तकपूजन, रांगोळी व अथर्वशीर्ष पठण झाले.

### करंदी येथे एटीएम चोरीचा थरार

**तळेगाव ढमढेरे :** करंदी (ता. शिरूर) येथे शिक्रापूर-चाकण रस्त्यालगत असलेल्या इंडिया वन एटीएम चोरीचा मंगळवारी (दि. २०) मध्यरात्री प्रयत्न झाला. पाच सशस्त्र चोरट्यांनी एटीएम पिकअपला दोरीने बांधून बाहेर ओढले. मात्र, शेजारील दुकानदार जागा झाल्याने त्यांचा डाव फसला. चोरट्यांनी पिकअप घटनास्थळीच सोडून अंधाराचा फायदा घेत पळ काढला. पोलिस तपास सुरू आहे.

---

## जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीत चौरंगी लढत; शिवसेना, राष्ट्रवादी, भाजप आणि मनसे आमनेसामने

# ओतूर-धालेवाडी गटात राजकीय रणधुमाळी!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ओतूर :** जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या होऊ घातलेल्या निवडणुकांनी जुन्नर तालुक्यातील राजकारणाला मोठी कलाटणी दिली असून, ओतूर-धालेवाडी जिल्हा परिषद गटात चौरंगी लढत अटळ ठरली आहे. सतत बदलणाऱ्या राजकीय युती, इच्छुकांचे पक्षांतर आणि अपक्षांची वाढती संख्या यामुळे मतदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक वर्षे लांबलेल्या निवडणुकांनंतर राज्यातील बदलते राजकीय चित्र आणि स्थानिक नेत्यांची धावपळ यामुळे राजकीय गणिते विस्कळीत झाल्याचे स्पष्ट दिसत आहे.

ओतूर-धालेवाडी गटात जिल्हा परिषदेसाठी सहा उमेदवारी अर्ज दाखल झाले असून, पंचायत समितीसाठी ओतूर गणातून सहा तर धालेवाडी-हवेली गणातून चार उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसकडून जिल्हा परिषदेसाठी ओतूरच्या सरपंच डॉ. छायाताई तांबे, तर पंचायत समितीसाठी उपसरपंच प्रशांत डुंबरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. शिवसेना (शिंदे गट) कडून जिल्हा परिषदेसाठी अक्षदा पानसरे, तर पंचायत समितीसाठी रोहोकडीचे सरपंच सचिन घोलप रिंगणात उतरले आहेत. भाजपकडून जिल्हा परिषदेसाठी गीता डुंबरे, तर पंचायत समितीसाठी दत्तात्रय डुंबरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. मनसेकडून जिल्हा परिषदेसाठी प्रांजल भाटे यांनी उमेदवारी दिल्याने ही लढत चौरंगी झाली आहे. त्यातच अपक्ष उमेदवारांनी दंड ठोकल्याने सर्वच पक्षांची डोकेदुखी वाढली आहे.

ओतूर-धालेवाडी गटाची रचना यावेळी बदलल्याने या परिसरात जुन्नरचे माजी आमदार अतुल बेनके आणि विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशीलदादा शेरकर यांचे वर्चस्व असल्याचे बोलले जात आहे. भाजपचे युवा तालुकाध्यक्ष गणेश कवडे यांचा दांडगा जनसंपर्क लक्षात घेता आमदार शरद सोनवणे यांनीही या गटावर विशेष लक्ष केंद्रित केल्याचे दिसते. मात्र सर्वच पक्षांतील ज्येष्ठ नेते या निवडणूक प्रक्रियेत सध्या अलिप्त असल्याचे चित्र असून, ही बाब राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे.

**+ , अपक्षांमुळे समीकरणे गुंतागुंतीची**

पूर्वी ओतूर-पिंपरी पेंढार असा असलेला हा जिल्हा परिषद गट यावेळी बदलल्याने राष्ट्रवादीला आपला गड राखण्यासाठी अधिक मेहनत घ्यावी लागणार आहे. राष्ट्रवादी आणि शिवसेना (उबाठा गट) एकत्रित लढत असून, घड्याळाच्या चिन्हावर उमेदवार उभे करण्यात आले आहेत. या आघाडीची सांगड माजी आमदार अतुल बेनके कितपत यशस्वीपणे बांधू शकतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

शिवसेना (शिंदे गट) च्या उमेदवार अक्षदा पानसरे या राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवती अध्यक्षा होत्या. त्यांनी महिला सक्षमीकरणासाठी संघटन उभे केले असून, माजी आमदार अतुल बेनके यांच्या नेतृत्वाखाली अनेक विकासकामे मार्गी लावली आहेत. मात्र राष्ट्रवादीची उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी शिवसेनेत प्रवेश करत उमेदवारी निश्चित केली. भाजपने नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकांत मिळवलेल्या यशाच्या जोरावर गीता डुंबरे यांच्या माध्यमातून ताकद आजमावण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. मनसेच्या प्रांजल भाटे यांच्या उमेदवारीमुळे ही लढत अधिक रंगतदार झाली आहे.

**निवडणुकीचे चित्र अधिक स्पष्ट होणार**

● पंचायत समितीच्या ओतूर गणात राष्ट्रवादीचे प्रशांत डुंबरे, शिवसेना (शिंदे गट) चे सचिन घोलप आणि भाजपचे दत्तात्रय डुंबरे यांच्यात तिरंगी लढत अपेक्षित असून, अपक्षांची भूमिका निर्णायक ठरण्याची शक्यता आहे. सर्वच पक्षांनी उमेदवारी अर्ज दाखल करताना शक्तिप्रदर्शन केल्याने ओतूर-धालेवाडी गटात सध्या राजकीय चर्चांना उधाण आले आहे. आगामी काही दिवसांत निवडणुकीचे चित्र अधिक स्पष्ट होणार असले, तरी सध्या हे चारही चेहरे मतदारांच्या केंद्रस्थानी आहेत.

---

# जुन्नर तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक चुरशीची

## अर्जदारांची संख्या वाढली उमेदवारीसाठी रंगणार राजकीय रणधुमाळी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जुन्नर :** जुन्नर तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी राजकीय वातावरण तिखट झाले आहे. जिल्हा परिषदेसाठी आठ गटांमध्ये पन्नास, तर पंचायत समितीसाठी सोळा गणांमध्ये नव्वद उमेदवारांनी अर्ज दाखल केले असून, निवडणूक अत्यंत चुरशीची होणार आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी स्वप्नील मोरे आणि सहाय्यक निवडणूक अधिकारी सुनील शेळके यांनी दिलेल्या माहितीनुसार, तालुक्यात एकूण २४ जागांसाठी १४० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी जोरदार शक्ती प्रदर्शन केले, ज्यामुळे निवडणुकीची रंगत आणखी उग्र झाली आहे.

जिल्हा परिषदेसाठी उमेदवारांची संख्या गटानिहाय अशी आहे:
उदापूर-पूर-डिंगोरे – ६
ओतूर-धालेवाडी – ६
आळे-पिंपळवंडी – १०
राजुरी-बेल्हे – ४
बोरी बुद्रुक-खोडद – ५
नारायणगाव-वारूळवाडी – ५
सावरगाव-कुसुर – ८
बारव-तांबे – ६

पंचायत समितीसाठी उमेदवारांची संख्या गणानिहाय अशी आहे:
उदापूर – ९, डिंगोरे – ५, ओतूर – ६, धालेवाडी-हवेली – ४
पिंपळवंडी – ७, आळे – ५, राजुरी – ६, बेल्हे – ५
बोरी बुद्रुक – ६, खोडद – ३, नारायणगाव – ५, वारूळवाडी – ५
सावरगाव – ७, कुसूर – ६, बारव – ४, तांबे – ७

विशेष म्हणजे जिल्हा परिषदेसाठी आळे-पिंपळवंडी गटात १०, तर पंचायत समितीसाठी उदापूर गणात ९ उमेदवारांनी अर्ज दाखल करून सर्वाधिक आकांक्षा दर्शवल्या आहेत.

सर्व राजकीय पक्षांनी उमेदवारी अर्ज दाखल करताना सक्रिय सहभाग नोंदवला असून, नाराज उमेदवारांची नाराजी दूर करून उमेदवारी माघारी घेण्यास पक्षांना मोठा कस लागणार आहे. यामुळे आगामी निवडणुकीत तालुक्यात राजकीय रणधुमाळी आणि मतदारांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

---

# झालं बाटुकाचं जिणं' काव्यसंग्रहाचा चौथा राज्यस्तरीय पुरस्कार!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिक्रापूर :** निमगाव म्हाळुंगी (ता. शिरूर) येथील युवा कवी आकाश हरिभाऊ भोरडे यांनी रचलेला 'झालं बाटुकाचं जिणं' हा शेतकरी जीवनावर आधारित काव्यसंग्रह अल्पावधीतच राज्यभरात वाचकांच्या पसंतीस उतरला असून, या काव्यसंग्रहाला चौथा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे. माहेर संस्थेच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय माहेर साहित्यरत्न पुरस्कार या काव्यसंग्रहाला प्रदान करण्यात येणार असल्याने साहित्य क्षेत्रात आनंदाची लाट उसळली आहे.

'झालं बाटुकाचं जिणं' या काव्यसंग्रहातून शेती, माती, निसर्ग, समाजव्यवस्था आणि शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनातील संघर्ष, वेदना व आशा यांचे संवेदनशील चित्रण करण्यात आले आहे. साध्या, पण परिणामकारक शब्दांतून मांडलेली ग्रामीण वास्तवाची अनुभूती वाचकांच्या मनाला भिडत असल्याने हा काव्यसंग्रह अल्पावधीत लोकप्रिय ठरला आहे.




दोन महिन्यांपूर्वी प्रकाशित झालेल्या या काव्यसंग्रहाला यापूर्वीच राज्यस्तरीय माणगंगा साहित्यप्रेमी गौरव पुरस्कार, पद्मश्री नारायण सुर्वे साहित्य पुरस्कार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रांतिरत्न गौरव पुरस्कार मिळाले आहेत. आता चौथ्या पुरस्काराच्या रूपाने माहेर साहित्यरत्न पुरस्कार जाहीर झाल्याने आकाश भोरडे यांच्या साहित्यिक वाटचालीला नवे बळ मिळाले आहे.



माहेर संस्थेच्या वतीने रत्नागिरी येथे आयोजित विशेष कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. राष्ट्रपती पुरस्कार व नारीशक्ती पुरस्काराने सन्मानित, जगातील प्रेरणादायी व्यक्तींच्या यादीतील समाजसेविका लुसी कुरियन यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात येणार आहे. याबाबतचे अधिकृत पत्र माहेर संस्थेचे प्रकल्प प्रमुख सुनील कांबळे आणि वृषभ खडसे यांनी आकाश भोरडे यांना सुपूर्द केले आहे. शेतकरी कुटुंबातून येणाऱ्या आकाश भोरडे यांच्या कवितांमध्ये ग्रामीण जीवनाची खरी झलक दिसून येते. शेतकऱ्यांच्या श्रमाचे मोल, त्यांची जगण्याची झुंज आणि समाजातील वास्तव त्यांनी प्रांजळपणे मांडले आहे. त्यामुळे त्यांच्या कवितांना साहित्यप्रेमींकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे.

**+ 'युवा कवी आकाश भोरडे यांच्या शेतकरी जीवनावर आधारित काव्यसंग्रहाला 'माहेर साहित्यरत्न पुरस्कार'; दोन महिन्यांत चार पुरस्कारांची गौरवशाली कामगिरी**

अल्पावधीत चार राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याने साहित्य क्षेत्रातून तसेच निमगाव म्हाळुंगी व परिसरातून आकाश भोरडे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, एक आशादायी युवा साहित्यिक म्हणून त्यांची ओळख अधिक दृढ होत आहे.

---

# श्री क्षेत्र लेण्याद्रीत माघी श्री गणेश जयंती उत्साहात साजरी

## भाविकांची पहाटेपासून गर्दी; अखंड हरिनाम सप्ताह आणि महाप्रसादाचा आनंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जुन्नर :** अष्टविनायकांपैकी एक तिर्थक्षेत्र असलेल्या श्री क्षेत्र लेण्याद्री येथे माघी श्री गणेश जयंती उत्सव पारंपारीक पद्धतीने व प्रचंड उत्साहात साजरा झाला. श्री गिरीजात्मज गणपतीच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

देवस्थानाचे अध्यक्ष अ‍ॅड. संजय ढेकणे यांच्या हस्ते सकाळी ६ वाजता विधीवत अभिषेक आणि महापूजा करण्यात आली. यानंतर हजारो भाविक भक्तांनी गणरायाचे दर्शन घेतले. मंदिर परिसरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती, तर दिवसभर सकाळी १० ते १२ या दरम्यान ह.भ.प. नामदेव महाराज वाळके यांचे देव जन्माचे किर्तन संपन्न झाले.

मंदिरात दुपारी १२ व सायंकाळी ६ वाजता महाआरती झाली, तर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. अखंड हरिनाम सप्ताह १६ ते २३ जानेवारी दरम्यान देवस्थानाच्या वतीने पार पडले. अखंड हरिनामाचा समारोप २३ जानेवारी रोजी ह.भ.प. श्रावण महाराज अहिरे यांच्या काल्याचे किर्तनाने होणार आहे.

देवस्थानात आलेल्या भाविकांसाठी विविध सेवा पुरवण्यात आल्या. गोळेगावचे राम मारुती कोकणे, धनंजय खंडू बिडवई आणि सृष्टी रमेश मसाल यांनी नैवेद्यादाखल फळे आणि केळी प्रदान केले. पुणे, अहमदनगर, मुंबई, ठाणे, नाशिकसह आसपासच्या गावांमधून भाविक आले होते.

यावेळी देवस्थानाचे अध्यक्ष अ‍ॅड. संजय ढेकणे, उपाध्यक्ष गोविंद मेहेर, सचिव शंकर ताम्हाणे, खजिनदार भगवान हांडे, विश्वस्त प्रभाकर जाधव, मच्छिंद्र शेटे, सुरेश वाणी, प्रभाकर गडदे, कार्यालयीन सचिव रोहीदास बिडवई, व्यवस्थापक निलेश सरजिने, कर्मचारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

या उत्सवानिमित्त पारंपरिक विधी, दर्शन, महाप्रसाद आणि हरिनाम सप्ताहामुळे लेण्याद्री परिसर भक्तिभावात न्हालून गेला. भाविकांचे सुलभ दर्शन सुनिश्चित करण्यासाठी देवस्थानाने योग्य गर्दी नियोजन केले होते, ज्यामुळे उत्सव सुरळीतपणे पार पडला.

---

### शिवसेना (ठाकरे)ला खिंडार; माऊली खंडागळे शिंदे गटात दाखल

**नारायणगाव / आळेफाटा:** महाविकास आघाडीच्या बैठकीचे निमंत्रण न मिळाल्याने नाराज झालेले शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जुन्नर तालुकाप्रमुख माऊली खंडागळे यांनी आपल्या पदाचा राजीनामा देत एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केला. आमदार शरद सोनवणे यांच्या रायगड निवासस्थानी हा प्रवेश पार पडला. खंडागळे यांच्यासह उपतालुकाप्रमुख मोहन बांगर व मंगेश काकडे यांनीही शिंदे गटात प्रवेश केला. या घडामोडीमुळे जुन्नर तालुक्यात राजकीय समीकरणे बदलली असून ठाकरे गटातील निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता व नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

---

# उसाच्या फडात दिसली बछडे, मजूर घाबरले; निघाली कोल्ह्याची पिल्ले

## महाळुंगे पडवळ येथे ऊस तोडणीदरम्यान घडला प्रकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** महाळुंगे पडवळ (ता. आंबेगाव) येथे बुधवारी (ता. २१) दुपारी उसाच्या फडात ऊस तोडणी सुरू असताना अचानक तीन बछडे दिसल्याने मजुरांमध्ये एकच गोंधळ उडाला. बिबट्याचे बछडे असल्याच्या संशयाने काम काही काळ थांबवण्यात आले आणि परिसरात भीतीचे वातावरण पसरले.

ही बाब लक्षात येताच ग्रामस्थांनीही घटनास्थळी धाव घेतली. मात्र, जवळून पाहणी केल्यानंतर हे बिबट्याचे बछडे नसून कोल्ह्याची पिल्ले असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे मजूर आणि ग्रामस्थांनी सुटकेचा निश्वास सोडला.



महाळुंगे पडवळ ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून ऊस तोडणीचे काम सुरू आहे. परिसरात वन्यप्राण्यांचा अधिवास असल्याने अशा घटना घडत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. तरीही, भविष्यातील संभाव्य धोके लक्षात घेऊन ऊस तोडणीदरम्यान सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे.न

---

## स्मशानभूमीत ओटीचे साहित्य, फळे, लिंबे व कापलेला कोहळा आढळला; नागरिकांचा संताप, कडक कारवाईची मागणी

# कळंब स्मशानभूमीत पुन्हा अघोरी कृत्य; जादूटोण्याच्या प्रकाराने गावात खळबळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** कळंब (ता. आंबेगाव) येथील स्मशानभूमीत जादूटोण्याशी संबंधित अघोरी प्रकार दुसऱ्यांदा उघडकीस आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. बुधवारी (ता. २१) सकाळी स्मशानभूमीत दगडांची मांडणी करून ओटीचे साहित्य, फळे, नारळ, हळदीकुंकू, शेंदूर तसेच कोहळा, कच्ची पपई, दहा-बारा लिंबे व ईडलिंबू आदी वस्तू ठेवलेली आढळून आली. या घटनेमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून समाजकंटकांवर कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे.

कळंब विविध कार्यकारी सोसायटीचे संचालक अभिजीत वसंतराव भालेराव हे बुधवारी सकाळी स्मशानभूमीत गेले असता हा प्रकार त्यांच्या निदर्शनास आला. त्यांनी तत्काळ ही बाब ग्रामस्थांना कळवली. त्यानंतर माजी उपसरपंच गोकुळ भालेराव, ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय कानडे, महेंद्र पारधी, बाळासाहेब भालेराव आदींनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. स्मशानभूमीसारख्या पवित्र आणि संवेदनशील ठिकाणी असे प्रकार घडत असल्याने सर्वत्र संतापाची भावना दिसून आली.

घटनास्थळी दगडांची विशिष्ट रचना करून ओटीचे साहित्य मांडण्यात आले होते. दोन नारळांवर हळदीकुंकू व शेंदूर वाहण्यात आलेला दिसून आला. त्याचबरोबर कोहळा व कच्ची पपई कापून ठेवलेली होती, तसेच अनेक लिंबे आणि ईडलिंबूही आढळले. हे सर्व प्रकार जादूटोण्याच्या अंधश्रद्धेशी संबंधित असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. यापूर्वीही याच ठिकाणी अशाच स्वरूपाचा प्रकार घडल्याची नोंद असून, पुन्हा एकदा अशी घटना घडल्याने नागरिकांच्या चिंतेत भर पडली आहे.

ग्रामस्थांनी सांगितले की, समाज प्रगतशील होत असताना अजूनही काही लोक अंधश्रद्धा, जादूटोणा यांसारख्या अघोरी कृत्यांना खतपाणी घालत आहेत, हे अत्यंत लाजिरवाणे आहे. अशा प्रकारांमुळे समाजात भीतीचे वातावरण निर्माण होते, तसेच सामाजिक सलोखा बिघडण्याचीही शक्यता असते. विशेषतः स्मशानभूमीत असे प्रकार केल्याने मृतांच्या सन्मानालाही तडा जात असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. या घटनेनंतर ग्रामपंचायतीकडून तसेच स्थानिक नागरिकांकडून प्रशासनाकडे तक्रार दाखल करण्याची तयारी सुरू आहे.

"स्मशानभूमीत घडलेला अघोरी प्रकार निंदनीय आहे. भविष्यात असे प्रकार करताना कोणी आढळून आल्यास जादूटोणा विरोधी कायद्याअंतर्गत कठोर कारवाई झाली पाहिजे," अशी ठाम भूमिका ग्रामस्थांनी मांडली आहे. पोलिस व प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन दोषींना शोधून कडक शिक्षा द्यावी, अशी मागणीही करण्यात येत आहे. दरम्यान, वारंवार घडणाऱ्या अशा घटनांमुळे कळंब गावात अस्वस्थता पसरली असून, अंधश्रद्धा निर्मूलनासाठी जनजागृती आणि कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची गरज अधोरेखित होत आहे.

---

# भोर-राजगड रस्त्यांवर जागतिक सायकल स्पर्धेचा थरार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नसरापूर :** 'बजाज पुणे ग्रँड टूर-2026' च्या जागतिक सायकल स्पर्धेत 40 देशांतील 176 सहभागी सायकलपटूंना भोर व राजगड तालुक्यातील नागरिकांनी उत्स्फूर्त स्वागत केले. रस्त्याच्या दोन्ही बाजूला उभे राहून नागरिकांनी पारंपरिक मराठमोळ्या तालावर टाळ्या व ढोल-ताशे वाजवत खेळाडूंना प्रेरित केले.

स्पर्धा दिवळे, कापूरहोळ, तेलवडी, मोहरी, हातवे, केतकावणे, दीडघर, वीरवाडी, जांभळी, कुरंगवडी, आंबवणे, करंजावणे, मांगदरी, कोळवडी, वांगणी आणि निगडे या गावांमधून झाली. शालेय विद्यार्थी व सामाजिक संघटनांनी सायकलपटूंच्या वेग, जिद्द आणि चपळतेवर भर देत उत्साह वाढवला. या मार्गावर नागरिकांनी प्रत्यक्ष सायकलपटूंना बघून रोमांचक अनुभव घेतला.कापूरहोळ गावातील स्वागत विशेष आकर्षण ठरले. शिवछत्रपती तरुण मंडळाच्या ढोल-लेझीम प्रदर्शनासह शालेय विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक वेशभूषेत कला सादर केली. उपसरपंच पंकज गाडे यांनी सांगितले की, या स्वागताने खेळाडूंमध्ये उत्साह वाढवला. सुरक्षेच्या दृष्टीने मार्गावर सुमारे 700 पोलिसांची कडेकोट तैनाती करण्यात आली होती. स्पर्धेच्या माध्यमातून दोन्ही तालुक्यांतील नैसर्गिक सौंदर्य, पर्यटनस्थळे, शिवकालीन इतिहास आणि स्थानिक संस्कृती जागतिक स्तरावर पोहोचली. या स्पर्धेत नागरिकांनी टीव्हीवर पाहण्याऐवजी मार्गावर जाऊन सायकलपटूंना प्रोत्साहन दिले.

## सारांश वृत्त

### कोलकाता मेट्रोची ब्लू लाईन सेवा अंशतः विस्कळीत



**दावोस :** मध्यमकोलकाता गुरुवारी सकाळी कोलकाता मेट्रोच्या ब्लू लाईनवरील सेवा पुन्हा विस्कळीत झाल्या, असे एका निवेदनात म्हटले आहे. सकाळी ७.३५ वाजता सेवा विस्कळीत झाल्या आणि ८.१७ वाजता पुन्हा सुरू झाल्या, असे त्यात म्हटले आहे. ४० मिनिटांच्या या व्यत्ययादरम्यान, मैदान आणि दक्षिणेश्वर तसेच टॉलीगंज येथील महानायक उत्तम कुमार आणि बिरजी येथील शहीद खुदीराम यांच्या दरम्यान सेवा खंडित करण्यात आल्या, असेही त्यात म्हटले आहे.

### कार आणि ट्रकच्या धडकेत तिघे ठार

**भुवनेश्वर :** ओडिशाच्या खुर्दा जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग १६ वर एका ट्रकला कारने धडक दिल्याने तीन जणांचा मृत्यू झाला तर एक जण गंभीर जखमी झाला, अशी माहिती पोलिसांनी गुरुवारी दिली. इन्फो व्हॅली पोलिस स्टेशन हद्दीतील भुवनेश्वरजवळील पितापल्ली परिसरात बुधवारी रात्री एसयूव्हीने मागून मालवाहू वाहनाला धडक दिल्याने हा अपघात झाला, असे अधिकाऱ्याने सांगितले. "एसयूव्हीच्या चालकाने एका वाहनाला ओव्हरटेक करताना वेग वाढवला आणि ट्रकला धडक दिली. २० वर्षांच्या वयोगटातील तीन तरुणांचा जागीच मृत्यू झाला.

### पंजाब, हरियाणात थंडी कायम

**चंदीगड :** पंजाब आणि हरियाणाच्या अनेक भागात थंडीचा कडाका कायम राहिला, होशियारपूरमध्ये किमान तापमान ३.३ अंश सेल्सिअस होते. हवामान खात्यानुसार, होशियारपूर हे पंजाबमधील सर्वात थंड ठिकाण होते. अमृतसरमध्येही कडाक्याची थंडी होती, जिथे किमान तापमान ३.४ अंश सेल्सिअस नोंदवले गेले, तर भटिंडामध्ये किमान तापमान ५ अंश सेल्सिअस नोंदवले गेले.

## राज्यपालांनी दोन ओळी वाचून भाषण अर्ध्यावर सोडले

# कर्नाटक विधानसभेत अभूतपूर्व प्रसंग

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**बंगळुरू :** देशात सुरू असलेल्या 'राज्यपाल विरुद्ध राज्य सरकार' या संघर्षमालिकेत गुरुवारी कर्नाटकात एक अभूतपूर्व आणि वादग्रस्त अध्याय जोडला गेला. कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत यांनी विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी संयुक्त अधिवेशनाला संबोधित करताना अवघ्या दोन ओळी वाचल्या आणि संपूर्ण भाषण न वाचताच सभागृहातून बाहेर पडले. या घटनेमुळे काँग्रेस सरकार आणि राजभवन यांच्यातील आधीपासूनच ताणलेले संबंध पुन्हा एकदा उघड झाले.

राज्यपालांनी सभागृहात सदस्यांचे स्वागत केले आणि "संयुक्त अधिवेशनाला संबोधित करण्यास मला आनंद होत आहे," असे सांगितल्यानंतर हिंदीत केवळ दोन ओळी वाचल्या. "माझे सरकार राज्याचा आर्थिक, सामाजिक आणि भौतिक विकास दुप्पट करण्यासाठी वचनबद्ध आहे. जय हिंद, जय कर्नाटक," एवढे बोलून त्यांनी भाषण सभागृहाच्या टेबलावर ठेवले, त्यावर 'वाचलेले' अशी नोंद केली आणि तत्काळ सभागृह सोडले.

या संघर्षाचे मूळ राज्य सरकारने तयार केलेल्या राज्यपालांच्या अभिभाषणातील ११ परिच्छेदांमध्ये आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, या परिच्छेदांमध्ये केंद्र सरकार आणि त्याच्या धोरणांवर, विशेषतः मनरेगाच्या जागी आणलेल्या 'विकसित भारत हमी रोजगार आणि उपजीविका अभियान' (जी रामजी) या नव्या योजनेवर तीव्र टीका करण्यात आली होती. कर्नाटक सरकारने या योजनेला गरिबांच्या हक्कांवर गदा आणणारी म्हटले होते.

राज्यपाल गेहलोत यांनी भाषणाला मंजुरी देण्यापूर्वी हे ११ परिच्छेद काढून टाकावेत किंवा त्यात बदल करावेत, असा सल्ला दिल्याचे सांगितले जाते. मात्र मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि मंत्रिमंडळाने याला स्पष्ट नकार दिला. मंत्रिमंडळाचे म्हणणे होते की, हे भाषण सरकारच्या धोरणांचे प्रतिबिंब आहे आणि ते वाचणे ही राज्यपालांची घटनात्मक जबाबदारी आहे.

गुरुवारी सकाळी राज्यपाल विधानसभेत पोहोचताच मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि सभापतींनी त्यांचे स्वागत केले. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेला वाद मिटेल, अशी अपेक्षा होती. मात्र राज्यपालांनी भाषण अर्ध्यावर सोडताच सभागृहात गोंधळ उडाला. काँग्रेस आमदारांनी निषेध नोंदवला आणि काही आमदारांनी राज्यपालांना घेरण्याचाही प्रयत्न केला.

राज्यपाल निघून गेल्यानंतर मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली. "दरवर्षी राज्यपालांनी मंत्रिमंडळाने तयार केलेले भाषण संयुक्त अधिवेशनात वाचणे ही घटनात्मक आवश्यकता आहे. आज राज्यपालांनी ते न वाचता स्वतः तयार केलेले काही शब्द बोलले. हे भारतीय संविधानाच्या कलम १७६ आणि १६३ चे उल्लंघन आहे," असा आरोप त्यांनी केला. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा पर्याय सरकार विचाराधीन असल्याचेही त्यांनी सूचित केले.

कर्नाटकची घटना ही बिगर-भाजपा सरकारे असलेल्या राज्यांमध्ये राज्यपाल आणि सरकार यांच्यातील वाढत्या संघर्षाची पुढची कडी मानली जात आहे. यापूर्वी तामिळनाडूमध्ये राज्यपाल आर.एन. रवी यांनी संपूर्ण भाषण वाचण्यास नकार देत सभागृह सोडले होते, तर केरळमध्ये राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ आर्लेकर यांनी केंद्रावर टीका करणारे परिच्छेद वगळून भाषण केले होते. या घटनांमुळे राज्यपालांची भूमिका आणि घटनात्मक मर्यादा यावर पुन्हा एकदा राष्ट्रीय पातळीवर तीव्र चर्चा सुरू झाली आहे.

## किश्तवाडमध्ये पुन्हा चकमक दहशतवाद्यांचा गोळीबार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जम्मू :** जम्मू आणि काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यातील उंच डोंगराळ भागात सुरू असलेल्या शोध मोहिमेदरम्यान गुरुवारी सुरक्षा दल आणि लपून बसलेल्या दहशतवाद्यांमध्ये पुन्हा एकदा चकमक झाली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

रविवारी चतरू पट्ट्यातील मंद्राल-सिंहपोरा परिसरात असलेल्या सोन्नार गावाजवळ ही कारवाई सुरू करण्यात आली होती. त्या वेळी झालेल्या गोळीबारात एका पॅराट्रूपरचा मृत्यू झाला होता, तर सात अन्य जवान जखमी झाले होते.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, गुरुवारी सकाळी सिंहपोरा परिसरातील घनदाट जंगलात लपलेल्या दहशतवाद्यांशी पुन्हा संपर्क प्रस्थापित झाला. शेवटचे वृत्त मिळाले तेव्हा दोन्ही बाजूंनी जोरदार गोळीबार सुरू असून, परिसरात सक्रिय असलेल्या दहशतवाद्यांना निष्क्रिय करण्यासाठी सुरक्षा दलांकडून प्रयत्न सुरू आहेत.

दरम्यान, सोमवारी चकमकीच्या ठिकाणाजवळ दहशतवाद्यांचा एक मोठा अड्डा उघडकीस आला होता. या प्रकरणात संशयाच्या आधारे अनेक व्यक्तींना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

प्राथमिक माहितीनुसार, पाकिस्तानस्थित जैश-ए-मोहम्मद (जेईएम) या दहशतवादी संघटनेशी संबंधित दोन ते तीन दहशतवादी या भागात अडकल्याचे मानले जात आहे. सुरक्षा दलांनी संपूर्ण परिसरात घेराबंदी वाढवून शोध मोहीम अधिक तीव्र केली आहे.

## सज्जनकुमार यांना न्यायालयाचा दिलासा

### १९८४ शिखविरोधी दंगल प्रकरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** १९८४ च्या शीखविरोधी दंगलीदरम्यान जनकपुरी आणि विकासपुरी भागात हिंसाचार भडकवल्याच्या आरोपांप्रकरणी दिल्ली न्यायालयाने गुरुवारी माजी काँग्रेस खासदार सज्जन कुमार यांची निर्दोष मुक्तता केली. विशेष न्यायाधीश डीआयजी विनय सिंग यांनी हा निर्णय जाहीर केला असून, आदेश अद्याप जारी झालेला नाही.

ऑगस्ट २०२३ मध्ये न्यायालयाने कुमार यांच्याविरुद्ध दंगल घडवणे आणि समुदायांमध्ये शत्रुत्वाला प्रोत्साहन देणे हे आरोप निश्चित केले होते. हे प्रकरण फेब्रुवारी २०१५ मध्ये विशेष तपास पथकाने नोंदवलेल्या दोन एफआयआरमधून पुढे आले होते.

पहिला खटला १ नोव्हेंबर १९८४ रोजी जनकपुरी परिसरात सोहन सिंग आणि त्यांचे जावई अवतार सिंग यांच्या हत्येशी संबंधित होता. दुसरा खटला २ नोव्हेंबर १९८४ रोजी विकासपुरी येथे गुरचरण सिंग यांना जाळून ठार केल्याच्या कथित घटनेशी संबंधित होता. या प्रकरणातून निर्दोष मुक्तता मिळाली असली, तरी सज्जन कुमार सध्या तुरुंगातच आहेत. सरस्वती विहार परिसरात दंगलीदरम्यान जसवंत सिंग आणि त्यांचा मुलगा तरुणदीप सिंग यांच्या हत्येप्रकरणी ट्रायल कोर्टाने त्यांना २५ फेब्रुवारी २०२४ रोजी जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती.

न्यायालयाने हा गुन्हा गंभीर असला, तरी मृत्युदंड देण्याच्या 'दुर्मिळातील दुर्मिळ' श्रेणीत न बसणारा असल्याचे स्पष्ट केले होते. सरस्वती विहार प्रकरण हे हिंसक पद्धतीचा भाग असल्याचे नमूद करत, दिल्ली उच्च न्यायालयाने यापूर्वी १७ डिसेंबर २०१८ रोजी पालम कॉलनी दंगल प्रकरणातही कुमार यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती.

## बीसीसीआयविरोधात याचिका; न्यायालय संतप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) विरोधात दाखल करण्यात आलेल्या एका याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. राष्ट्रीय क्रिकेट संघाला 'भारतीय क्रिकेट संघ' किंवा 'टीम इंडिया' म्हणून संबोधू नये, अशी मागणी करणाऱ्या याचिकाकर्त्याला सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी न्यायालयाचा वेळ वाया घालवल्याबद्दल फटकारले. न्यायालयाने ही याचिका फालतू ठरवत फेटाळून लावली.

रिपक कंसल यांनी दाखल केलेल्या या याचिकेत बीसीसीआय ही तामिळनाडू सोसायटी नोंदणी कायद्यांतर्गत नोंदणीकृत खाजगी संस्था असून ती कोणतीही सरकारी संस्था नाही, असा दावा करण्यात आला होता. तसेच क्रीडा मंत्रालयाने आरटीआयच्या उत्तरांमधून वारंवार स्पष्ट केले आहे की बीसीसीआयला राष्ट्रीय क्रीडा महासंघाचा दर्जा नाही आणि सरकारकडून तिला कोणतेही आर्थिक सहाय्य मिळत नाही, याकडेही याचिकेत लक्ष वेधण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर, सरकारी माध्यमे आणि प्रसारमाध्यमे बीसीसीआयच्या संघाला 'भारतीय राष्ट्रीय संघ' किंवा 'टीम इंडिया' म्हणून संबोधतात, तसेच प्रसारणात तिरंग्यासारख्या राष्ट्रीय चिन्हांचा वापर केला जातो, यावर याचिकाकर्त्याने आक्षेप घेतला होता. या सर्व बाबी थांबवाव्यात, अशी मागणी सर्वोच्च न्यायालयाकडे करण्यात आली होती.

या याचिकेवर सुनावणी करताना सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाला बागची यांच्या खंडपीठाने तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. दिल्ली उच्च न्यायालयाने याआधीही अशीच याचिका फेटाळून लावल्याचे खंडपीठाने नमूद केले. "तुम्ही घरी बसून याचिका तयार करता आणि थेट सर्वोच्च न्यायालयात येता. राष्ट्रीय क्रीडा न्यायाधिकरणासाठी अधिसूचना जारी करण्यात आली आहे, ज्यामध्ये सक्षम सदस्य आहेत. अशा प्रकरणांसाठी योग्य मंच उपलब्ध असताना न्यायालयावर ओझे टाकू नका," असे सरन्यायाधीशांनी सुनावले.

न्यायालयाने ही याचिका निरर्थक ठरवत फेटाळून लावली. "उच्च न्यायालयाने दंड ठोठावायला हवा होता. दंड न झाल्यामुळेच याचिकाकर्त्याला सर्वोच्च न्यायालयात येण्याचे धाडस झाले," अशी टिप्पणीही खंडपीठाने केली. अशा फालतू याचिका सर्वोच्च न्यायालयात येण्यापासून कशा रोखायच्या, असा प्रश्नही न्यायालयाने उपस्थित केला.

## सारंडात सुरक्षा दल-नक्षल्यात चकमक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रांची :** झारखंडमधील सारंडा जंगलात छोटानागरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कुंबाडीह गावाजवळ गुरुवारी सुरक्षा दल आणि माओवाद्यांमध्ये जोरदार चकमक झाली. या कारवाईत ५० लाख रुपयांचे बक्षीस असलेला एक माओवादी ठार झाला असून, एकूण किमान चार माओवादी मारले गेल्याची माहिती स्थानिक सूत्रांनी दिली आहे. मात्र मृतांची नेमकी संख्या अद्याप अधिकृतरीत्या स्पष्ट करण्यात आलेली नाही.

पोलिस सूत्रांनुसार, माओवादविरोधी मोहिमेअंतर्गत सुरक्षा दल दाट सारंडा जंगलात शोध मोहीम राबवत असताना दबा धरून बसलेल्या माओवाद्यांनी गोळीबार केला. जवानांनी तत्काळ प्रत्युत्तर दिल्यानंतर दोन्ही बाजूंमध्ये दीर्घकाळ जोरदार गोळीबार सुरू झाला. झारखंड पोलिस मुख्यालयाने जारी केलेल्या निवेदनात चायबासा परिसरातील सारंडा वनक्षेत्रात चकमक सुरू असल्याचे स्पष्ट केले आहे. सकाळपासून अधूनमधून गोळीबार सुरू असून, ऑपरेशन पूर्ण झाल्यानंतर सविस्तर माहिती दिली जाईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. जंगलात सुरू असलेल्या गोळीबारामुळे आसपासच्या गावांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

दीर्घकाळ चाललेल्या चकमकीमुळे नागरिकांमध्ये चिंता वाढली असल्याचे सांगितले जात आहे. कोल्हाण विभागाचे डीआयजी अनुरंजन किस्पोट्टा यांनीही चकमकीला दुजोरा दिला.

सध्या शोध आणि घेराबंदी मोहीम सुरू असल्याचे स्पष्ट केले आहे. खडकाळ भूभाग आणि घनदाट जंगल असलेला सारंडा परिसर दीर्घकाळ माओवाद्यांचा बालेकिल्ला मानला जातो. माओवाद्यांकडून आयईडी पेरल्याची शक्यता लक्षात घेऊन सुरक्षा दलांनी विशेष खबरदारी घेत संपूर्ण परिसर वेढ्यात घेतला आहे.

## थरूर यांच्याविरोधात फतवा काढणार का

# म्हणून भाजपाने काँग्रेसला डिवचले

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांचे केलेले कौतुक आता राजकीय वादाचे कारण ठरले आहे. नागपूरमधील एका भेटीनंतर थरूर यांनी गंभीर यांची खुलेपणाने प्रशंसा केली, त्यावरून भारतीय जनता पक्षाने काँग्रेसवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. भाजपने थरूर यांच्यावरच टोलेबाजी करत काँग्रेसमध्ये त्यांच्याविरोधात 'फतवा' निघणार का, असा उपरोधिक सवाल उपस्थित केला आहे.

शशी थरूर यांनी केलेल्या विधानाकडे लक्ष वेधत भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते शहजाद पूनावाला यांनी सोशल मीडियावर काँग्रेसवर टीका केली. "काँग्रेसला नेमका जास्त राग कशाचा येईल, हेच समजत नाही. थरूर यांची नागपूर भेट, गौतम गंभीरसोबतची त्यांची भेट आणि गंभीरची केलेली प्रशंसा, की थरूर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे काम भारतातील सर्वांत कठीण असल्याचे मान्य केले याचा?" असा सवाल पूनावाला यांनी केला. पूनावाला म्हणाले, "कदाचित हा तिसरा मुद्दाच अधिक खुपलेला दिसतो. भारताच्या हितापेक्षा कुटुंबाच्या हिताला प्राधान्य देणारा विरोधी पक्ष पंतप्रधानांना प्रश्न विचारतो, हे थरूर यांनी अप्रत्यक्षपणे मान्य केले आहे. त्यामुळे आता थरूर यांच्याविरुद्ध काँग्रेसकडून आणखी एक 'फतवा' जारी होणार का?" असा टोला त्यांनी लगावला.

क्रिकेटप्रेमी म्हणून ओळखले जाणारे शशी थरूर यांनी नागपूरमध्ये न्यूझीलंडविरुद्ध होणाऱ्या पहिल्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यापूर्वी गौतम गंभीर यांच्यासोबतचा एक सेल्फी सोशल मीडियावर शेअर केला होता. या पोस्टमध्ये त्यांनी गंभीर यांच्या नेतृत्वगुणांचे आणि कामावरील लक्षाचे भरभरून कौतुक केले.

थरूर यांनी लिहिले, "नागपूरमध्ये माझा जुना मित्र गौतम गंभीर याच्याशी मोकळेपणाने आणि चांगली चर्चा झाली. पंतप्रधानांनंतर भारतातील सर्वांत कष्टाळू माणूस म्हणून त्याच्याकडे पाहिले जाते. लाखो लोक रोज त्याच्या निर्णयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतात, पण तो शांतपणे, न डगमगता पुढे जातो. त्याचा शांत दृढनिश्चय आणि नेतृत्व नक्कीच कौतुकास्पद आहे. त्याला पुढील वाटचालीसाठी मनापासून शुभेच्छा."

थरूर यांच्या या पोस्टला स्वतः गौतम गंभीर यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत झालेल्या वादांचा संदर्भ देत इंस्टाग्रामवर लिहिले, "डॉ. शशी थरूर, खूप खूप धन्यवाद. जेव्हा सगळं स्पष्ट होईल, तेव्हा प्रशिक्षकाच्या कथित 'अमर्याद अधिकारां'मागील सत्य आणि त्यामागचा तर्क समोर येईल. तोपर्यंत, मी स्वतःविरुद्ध स्वतःला उभं करत माझा वेळ चांगल्या प्रकारे वापरत आहे." थरूर यांच्या या भूमिकेमुळे क्रिकेट आणि राजकारण यांचा संगम पुन्हा चर्चेत आला असून, काँग्रेसमधील अंतर्गत मतभेद आणि भाजपचा आक्रमक पवित्रा यामुळे हा मुद्दा पुढील काही दिवस राजकीय वर्तुळात गाजण्याची शक्यता आहे.

## बालोदाबाजारमधील स्टील कारखान्यात स्फोट

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**बालोदाबाजार :** छत्तीसगडमधील बालोदाबाजार जिल्ह्यातील भाटापारा परिसरात असलेल्या एका स्टील कारखान्यात बुधवारी मोठी दुर्घटना घडली. भाटापारा ग्रामीण भागातील बाकुलाही गावातील रिअल इस्पात स्पंज आयर्न फॅक्टरीमध्ये कोळशाच्या भट्टीचा अचानक स्फोट झाल्याने सहा कामगारांचा मृत्यू झाला असून अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. प्लांटमध्ये काही कामगार अद्याप अडकले असण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

पोलिस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, कामगार भट्टीजवळील प्लॅटफॉर्मवर काम करत असताना भट्टीचा जोरदार स्फोट झाला. या स्फोटामुळे गरम कोळसा आणि कचरा थेट कामगारांवर कोसळला. काही कामगार गरम कोळशात पडल्याने गंभीररीत्या भाजले गेले.

अपघातानंतर तातडीने बचावकार्य सुरू करण्यात आले. घटनास्थळावरून दहा जणांना बाहेर काढण्यात आले, त्यापैकी सहा जणांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. जखमींना प्रथम भाटापारा येथील सामुदायिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले, त्यानंतर गंभीर जखमींना पुढील उपचारांसाठी बिलासपूर येथे हलवण्यात आले.

स्थानिक प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, स्फोटानंतर संपूर्ण परिसरात घबराट पसरली. दाट धूर आणि ज्वाळांमुळे कामगार जीव वाचवण्यासाठी इकडे-तिकडे पळत होते. काहींना गरम कोळशाच्या संपर्कात आल्याने गंभीर भाजल्या.

घटनेची माहिती मिळताच पोलीस, जिल्हा प्रशासन आणि अग्निशमन दलाच्या गाड्या तात्काळ घटनास्थळी दाखल झाल्या. आग नियंत्रणात आणण्यासाठी आणि अडकलेल्या कामगारांचा शोध घेण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

दरम्यान, हा अपघात नेमका कशामुळे झाला, याचा तपास सुरू असून प्लांटमधील सुरक्षा व्यवस्थेची आणि नियमांचे पालन झाले होते की नाही, याचीही चौकशी करण्यात येत आहे.

## पंतप्रधान मोदींची आज केरळला भेट

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी केरळला भेट देतील आणि निवडणुकीच्या तोंडावर असलेल्या राज्यात नवोन्मेष आणि उद्योजकता केंद्राची पायाभरणी करतील आणि चार नवीन रेल्वे सेवांना हिरवा झेंडा दाखवतील. ते रस्त्यावरील विक्रेत्यांसाठी आर्थिक समावेशनाच्या पुढील टप्प्याचे चिन्ह म्हणून पंतप्रधान स्वानिधी क्रेडिट कार्ड देखील लॉंच करतील आणि एका आधुनिक पोस्ट ऑफिसचे उद्घाटन करतील. चार नवीन रेल्वे सेवांना ते हिरवा झेंडा दाखवणार आहेत.

## अशफाकच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाची नोटीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** लाल किल्ल्यावर झालेल्या हल्ल्यात तीन जवानांचा मृत्यू झाला होता, त्याप्रकरणी फाशीची शिक्षा सुनावलेल्या लष्कर-ए-तोयबाचा दोषी मोहम्मद आरिफ उर्फ अशफाक यांनी दाखल केलेल्या क्युरेटिव्ह याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी दिल्ली-एनसीटीला नोटीस बजावली.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील आणि न्यायमूर्ती विक्रम नाथ व जेके माहेश्वरी यांच्या खंडपीठाने नोटीस जारी करत सविस्तर उत्तर मागितले. न्यायालयाने ठामपणे म्हटले, "नोटीस जारी करा." अशफाकची ही याचिका त्यांच्या आधीच्या पुनर्विचार याचिका फेटाळल्याच्या निर्णयाला आव्हान देणारी आहे.

नोव्हेंबर २०२२ मध्ये त्याची पुनर्विचार याचिका फेटाळताना सर्वोच्च न्यायालयाने ही घटना भारताच्या एकता, अखंडता आणि सार्वभौमत्वावर थेट हल्ला असल्याचे म्हटले होते.

१७ व्या शतकातील स्मारक लाल किल्ल्यावर २००० मध्ये झालेल्या हल्ल्यातील सहभागासाठी अशफाकला दोषी ठरवण्यात आले आणि त्याला मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली.

२००७ मध्ये दिल्ली उच्च न्यायालय आणि २०११ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने ही शिक्षा कायम ठेवली होती.

## २४ तासांत सर्व तिकिटे विकली गेली

# कामाख्या-हावडा वंदे भारत स्लीपरला उदंड प्रतिसाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** आसाममधील कामाख्या आणि पश्चिम बंगालमधील हावडा दरम्यान धावणाऱ्या देशातील पहिल्या वंदे भारत स्लीपर ट्रेनच्या पहिल्या व्यावसायिक प्रवासाला प्रवाशांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. ट्रेन क्रमांक २७५७६ असलेल्या या गाडीचे तिकीट बुकिंग सुरू झाल्यानंतर अवघ्या २४ तासांच्या आत सर्व वर्गांची तिकिटे पूर्णपणे विकली गेली असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने मंगळवारी दिली.

रेल्वेच्या म्हणण्यानुसार, २२ जानेवारी रोजी कामाख्या येथून सुटणाऱ्या वंदे भारत स्लीपर ट्रेनसाठी पीआरएस आणि इतर अधिकृत तिकीट प्लॅटफॉर्मवर बुकिंग सुरू होताच काही तासांतच सर्व जागा भरल्या. ही जलद बुकिंग प्रक्रिया या नव्या सेवेबद्दल प्रवाशांमध्ये असलेली उत्सुकता आणि विश्वास स्पष्ट करते.

अत्याधुनिक सुविधा असलेल्या या स्लीपर वंदे भारत ट्रेनला १७ जानेवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हिरवा झेंडा दाखवला होता. रेल्वेने स्पष्ट केले आहे की, ही ट्रेन २२ जानेवारी रोजी कामाख्या येथून आणि २३ जानेवारी रोजी हावडा येथून पहिला व्यावसायिक प्रवास सुरू करेल. वार्ता वृत्तसंस्थेच्या माहितीनुसार, या गाडीचे तिकीट बुकिंग १९ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता सुरू झाले होते आणि २४ तासांपेक्षा कमी वेळात सर्व वर्गांतील तिकिटे विकली गेली.

कामाख्या-हावडा वंदे भारत स्लीपर एक्सप्रेसमुळे ईशान्य आणि पूर्व भारतामधील दळणवळण अधिक सुलभ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. आधुनिक डिझाइन, आरामदायी स्लीपर कोच, सुधारित प्रवास वेळ आणि रात्रीच्या प्रवासासाठी जागतिक दर्जाच्या सुविधा या सेवेचे प्रमुख वैशिष्ट्य ठरणार आहेत.

दरम्यान, या गाडीच्या तिकीट रद्दीकरणाबाबत रेल्वेने कठोर नियम लागू केले आहेत. वंदे भारत स्लीपर एक्सप्रेस आणि अमृत भारत २ गाड्यांसाठी, नियोजित सुटण्याच्या वेळेच्या आठ तास आधी कन्फर्म तिकीट रद्द केल्यास कोणतीही परतफेड मिळणार नाही. तसेच, कन्फर्म तिकीट ७२ तासांच्या आत रद्द केल्यास भाड्याच्या २५ टक्के रक्कम रद्दीकरण शुल्क म्हणून आकारली जाईल.

रेल्वे मंत्रालयाने १६ जानेवारी रोजी रेल्वे प्रवासी (तिकीट रद्द करणे आणि परतावा) नियम, २०१५ मध्ये सुधारणा करत हे नियम अधिसूचित केले आहेत. इतर गाड्यांप्रमाणेच, नियोजित प्रस्थान वेळेच्या चार तासांपेक्षा कमी वेळ आधी 'पुष्टी' तिकीट रद्द केल्यासही कोणतीही परतफेड दिली जाणार नाही, असे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.